# धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास

**Dharbandoda Talukyatil Lokkathancha Abhyas]**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**तन्वी संदीप वेळीप**

हजेरी क्र. 22P0190028

ABC ID 615844617495

पी. आर 201912207

मार्गदर्शक

**डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या**

(सहायक प्राध्यापक)
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा
मराठी अध्ययनशाखा

गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# DHARBANDODA TALUKYATIL LOKKATHANCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by


**Tanvi Sandeep Velip**

Seat No: 22P0190028

ABC ID: 615844617495

PRN: 201912207


Under the supervision of

**Dr.Hemant Aiya**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Hemant B. Aiya and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Tanvi Sandeep Velip

Seat no:22P0190028

Date: 16th April 2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report " धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास" is a bonafide work carried out by Ms Tanvi Sandeep Velip under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

16/04/2024

Dr. Hemant B. Aiya

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

Dept Stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास या विषयी गोवा विद्यापीठाच्या एम.ए मराठी पदवीसाठी संशोधन सादर करताना मला आनंद होत आहे. बी ए पर्यंत लोकसाहित्य याविषयी मी काहीच ऐकलं, वाचले नव्हते. विद्यापीठात आल्यानंतर भाग एकच्या वर्गात असताना आम्हाला लोकसाहित्य हा पेपर होता तो पेपर प्राध्यापक जयेशगावकर शिकवीत होते. त्यावेळी आम्हाला लोकता याविषयी पाठ्यपुस्तक अभ्यासासाठी होत. त्यात अनेक प्रकारच्या कथा होत्या. लोककथा वाचल्यावर माझ्या मनातही आपल्या गावातील लोककथांचा अभ्यास करण्याची इच्छा प्रकट झाली.

एम. ए भागच्या दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला मी निवडलेल्या संशोधन कार्याला मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. हेमंत अय्या सर मार्गदर्शक म्हणून मला लाभले. त्यानंतर सरांशी माझ्या विषयाशी चर्चा केली. सरांशी चर्चा करून मी ‘ धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास’ असा विषय निवडला. त्यानंतर सरांनी प्रकरणांची मांडणी कशी असेल यावर चर्चा करून पहिल्यांदा संकलनाचे कार्य पूर्ण करायला सांगितले.

या प्रबंधिकेचे महत्वाचे कार्य म्हणजे संकलन करणे. धारबांदोडा तालुक्यातील गावांच्या लोकांनी संकलनासाठी मला लोकांचे सहकार्य व्यवस्थित लाभले नाही. माझे मार्गदर्शक डॉ. हेमंत अय्या सरांचे मी सर्वप्रथम ऋणी आहे कारण सरांनी आम्हांला ज्या ज्या वेळी सरांची गरज भासली त्या वेळी वेळात वेळ काढून आम्हा सर्वांना मार्गदर्शन केले. माझ्या संकलनासाठी धारबांदोडा तालुक्यातील कुळे या गावातील सेजल नाईक यांनी मला त्या गावातील लोकांशी भेट करून दिली तसेच अनेक ठिकाणी संकलनासाठी जाताना ती माझ्या बरोबर होती. त्यासाठी त्याची मी मनापासून आभारी आहे. तसेच धुलो गावकर यांनी चांगल्या प्रकारे मला माहिती दिल्या बद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच संकलनासाठी जाताना आम्हाला वेळात वेळ काढून मला लोककथा सांगितल्या बद्दल तुळशीदास गावकर, लक्ष्मी वेळीप, सुमित्रा वेळीप, या सर्वांची मी ऋणी आहे. माझे आई- वडिल संदीप वेळीप आणि संजना वेळीप यांनीही मला त्यांचा पाठिंबा दिला. तसेच सण- उत्सव कसे साजरा करतात, त्यांच्या विधी कशी केली जाते याविषयीची माहिती मला दिली. त्याबद्दल मी त्यांची

ऋणी आहे. तसेच माझा भाऊ वेदांत वेळीप  संकलनाच्या वेळी तो माझ्या सोबत होता मी त्याची मनापासून आभारी आहे.

संशोधनाचे लेखन करीत असताना भाषिक अडचणी, पूर्ण वाक्य निर्मिती करताना अडथळा निर्माण झाल्या होत्या. या प्रबंधिकेमुळे अनेक गोष्टी समजल्या. काय करायच काय नाही हे कळल. सुरुवातीला वाटत होते की माझे संकलन पूर्ण होणारच नाही. कारण मी तालुका घेतलेला आणि त्यात अनेक गावे होती. पण शेवटी कसे कसे करून माझे संकलन पूर्ण झाले.

या संशोधनाच्या अभ्यासासाठी अनेक ग्रंथालयांना भेटी देण्यात आल्या. विशेष करून गोवा विद्यापीठ ग्रंथालय, कुडचडे सरकारी ग्रंथालय, केपे सरकारी ग्रंथालय, कृष्णदास शामा सरकारी केंद्रीय वाचनालय पणजी या ग्रंथालयातील ग्रंथसंपदा माझ्या या संशोधनासाठी उपयुक्त ठरली, त्यासाठी मी या सर्व संस्थेचे मनापासून आभारी आहे.तसेच तेथील ग्रथपाल आणि कर्मच्यारी वर्गाचेही मी मन पुर्वक आभारी आहे. मराठी विभागातील सर्व कर्मचारीवर्गाचे ही मला सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. माझ्या या संशोधन कार्याला प्र प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे ज्या-ज्या व्यक्तींनी मला मार्गदर्शन, सहकार्य केले,  त्या सर्वांचे तसेच कुटुंबीयांचे, मित्रांचे मी अत्यंत ऋणी आहे.

तन्वी वेळीप

# धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion Certificate | | |
| मनोगत | | I-II |
| प्रस्तावना | | 1 -4 |
| १. | **लोकसाहित्य आणि लोककथा** | 5-20 |
| २. | **धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृती व लोकजीवन** | 21-36 |
| ३. | **धारबांदोडा तालुक्यातील लोकवाङ्मय आणि लोककथा** | 37-75 |
| ४. | **धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचे प्रकार आणि वर्गीकरण** | 76-90 |
| ५. | **निष्कर्ष** | 91-93 |
| परिशिष्ट | | 94-103 |
| संदर्भ सूची | | 104-106 |

# प्रस्तावना

सतराव्या शतकात Folklore या ज्ञानशाखेचा अभ्यास जागतिक पातळीवर सुरू झाला. Folklore ही संज्ञा प्रथम विल्यम जॉन्स थॉमस या इंग्रजी लेखकाने वापरली. Folklore ही संकल्पना समाजशास्त्र, मानवशास्त्र व भाषाशास्त्र या अभ्यासातून आली. अनेक अभ्यासकांनी आपल्या गरजेनुजार आणि उपयुकत नुसार folklore चा व्याख्या मांडलेली आहे.

या प्रबंधिका लेखनाचा विषय ‘ धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास’ असा आहे. लोककथा म्हणजे मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित असलेल्या कथा. कथा आणि कथागीत असे दोन प्रकार यामध्ये येतात. लोककथा हे लोक मनोरंजनाचे माध्यम असल्यामुळे लोकजीवनात लोककथा सांगण्याची प्रथा रूढ झाली. लोककथातर्गत दंतकथा, दैवतकथा, अद्भुतकथा, नीतिकथा, प्राणीकथा, हास्यकथा, वीरकथा असे लोक कथांचे प्रकार आढळतात.

धारबांदोडा तालुक्यातील समाज, त्या लोकांची जीवनशैली, त्यांचा व्यावसाय, तिकडे होण्याऱ्या सण उत्सव या सगळयांचा आढावा सदर प्रबंधिकेत समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला जाईल; तसेच सर्वेक्षण करून अनुभवलेल्या लोकानुभवाला हाती मिळालेल्या माहितीचा शास्त्रशुद्ध तार्किक आणि पुराव्यानिशी मांडण्याचा प्रयत्न सदर प्रबंधिकेव्दारे केला जाईल.

**संशोधन विषयक समस्या**

लोककथांचा अभ्यास करत असताना संशोधका समोर अनेक समस्या असतात. लोककथा हा प्रकार जास्त जुन्या काळातील असल्याने एखाद्या कथेविषयी पूर्ण माहिती मिळविणे कठीण असते. जाणकार, वयस्कर लोक आता जास्त हयात नसल्याने कथांची माहिती मिळविणे कठिण ठरते. तसेच त्यांच्या उच्चारात सुद्धा चुका आढळण्याने माहिती मिळविणे कठिण आहे. त्या गावातील ज्या वयस्कर लोकांना ज्या लहान लहान गोष्ट्या माहित होत्या त्या आता इतर गावातील लोकांना माहित नसून; वयस्कर, जाणकार माणसे आता कमी झाल्याने ते ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहचविणे कठीण होत आहे. बदलत्या काळात तिथल्या

जीवनपध्दती, समाज, परंपरा, विधी यामध्ये झालेले बदल अधोरेखित करणे आणि हास होत चाललेल्या लोककथांचे संकलन करणे असे दुहेरी आयाम सदरठिकाणी बाळगलेले आहेत.

**संशोधनकार्याची उपयुक्तता/आवश्यकता**

लोकसाहित्याची जाण असलेली वयस्कर माणसे कमी होत चाललेली आहे. त्यामुळे लोककथांचे संकलन आणि सर्वधन होणे गरजेचे आहे. लोककथांचे संकलन केल्याने त्या कथा पुढच्या पिढीला उपयुक्त ठरून; भावा पिढीसाठी संशोधन साधने उपलब्ध होऊ शकतात. आजच्या काळात लोकसाहित्यातील अनेक गोष्टी लुप्त होत आहे. आपल्या भावी पिढीला आपली लोक संस्कृती, लोकपरंपरा याची ओळख होत आहे. आपल्या भावी पिढीला आपली लोकसंस्कृती, लोकपरंपरा याची ओळख व महत्व पुढच्या पिढीला अभ्यासातून उपयुक्त ठरेल. सांस्कृतिक व भौगोलिक दृष्टीने धारबांदोडा परिसराचा परिचय होईल.

**संशोधनकार्यामागची उद्दिष्टे**

1. धारबांदोडा तालुक्यातील लोकवाङमय आणि मौखिक परंपराचे स्वरूप जाणणे.
2. धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचे स्वरूप जाणणे.
3. धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचे संकलन करून त्यांचे वर्गीकरण करणे.
4. धारबांदोडा तालुक्यातील लोककथा आणि लोकजीवनातील परस्पर संबंध पडताळणे.
5. धारबांदोडा तालुक्यातील लोककथांच्या आधारे स्थानिक लोकसंस्कृतींच्या विशेषांचा पडताळ करणे.

**गृहितकांची मांडणी**

1. धारबांदोडा तालुक्यातील लोककथातून त्या परिसराचे लोकजीवन दर्शविते.
2. धारबांदोडा तालुक्यातील मौखिक परंपरेचा आशय या अंगाने महत्वाचा आहे.
3. प्रत्येक लोककथे मागे काहीतरी हेतू असतो.
4. धारबांदोडा तालुक्यातील लोककथा आणि लोकजीवन यात परस्पर संबंध दिसतो.

5. धारबांदोडा तालुक्यातील लोककथा व लोकसंस्कृतीचे समालोचन दिसते.

**संशोधन पद्धती**

लोकसाहित्याचा अभ्यास हा सामाजिक अंगाने पुढे जाणारा अभ्यास आहे. मौखिक परंपरा आणि भौतिक संस्कृतिचा अभ्यास आवश्यक असतो. त्यासाठी क्षेत्रीय अभ्यास पद्धती आणि या लेखनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा संशोधनात वापर होणार आहे.

**क्षेत्रीय अभ्यास पद्धती**

धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास इथ अभिप्रेत असल्याने प्रामुख्याने क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा वापर केलेला आहे. मुलाखाती घेणे, प्रत्यक्ष भेटी देणे, आधुनिक तंत्राचा वापर करून दृक श्राव्य पद्धतीव्दारे संकलन करणे, छायाचित्रे मिळविणे, असे संशोधनाचे स्वरूप आहे.

**वर्णनात्मक अभ्यास पद्धती**

संकलन करून मिळालेल्या माहितीनुसार ती मांडणी शास्त्रीय पद्धतीने मांडणे, त्यांची वर्गवारी करणे, त्यांचे विश्लेषण करून चिकित्सा करणे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृति चे वर्णनात्मक पद्धतीच्या आधारे स्पष्ट केलेले आहे.

**प्रकरणांची मांडणी**

| ‘धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास’ | |
|---|---|
| प्रकरण १ | लोकसाहित्य आणि लोककथा |
| प्रकरण २ | धारबांदोडा तालुक्यातील लोक संस्कृती व जीवन |
| प्रकरण ३ | धारबांदोडा तालुक्यातील लोकवाङमय आणि |

| | |
|---|---|
| | लोककथा |
| प्रकरण ४ | धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचे प्रकार आणि वर्गीकरण |
| प्रकरण ५ | निष्कर्ष |

**समारोप**

'धारबांदोडा तालुक्यातील लोककथांचा अभ्यास' या विषयाअंतर्गत धारबांदोडा तालुक्यातील आढळणारे विविध लोककथांचा अभ्यास होणार आहे. लोककथातून दिसणारे तिथून संस्कृतीचे वर्णन होणार आहे. लोककथांचा ह्यापूर्वी असा अभ्यास झाला नाही. त्यामुळे हा अभ्यास होणे गरजेचे वाटते. तसेच ह्यापूर्वी झालेले लोकसाहित्याचे संशोधनाचा आधार ग्रंथ म्हणून वापर होणार आहे. या प्रबंधासाठी काही मुलाखती, प्रत्यक्ष भेटी घेणार आहे. त्याचबरोबर छायाचित्रांचा समावेश होणार आहे.

# प्रकरण १

# लोकसाहित्य आणि लोककथा

**प्रास्ताविक** .......... **7**

**१.१ लोकसाहित्य म्हणजे काय?** .......... **7**

**१.२ लोकसाहित्याची व्याप्ती** .......... **8**

१.२.१ मौखिक आविष्कार .......... **8**

१.२.२ भौतिक संस्कृती .......... **8**

१.२.३ लोकरूढी, विधी, समजुती इत्यादी .......... **9**

१.२.४ प्रयोगसिद्ध लोककला .......... **9**

**१.३. लोकसाहित्याच्या व्याख्या** .......... **9**

**१.४ भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या** .......... **10**

**१.५ लोकसाहित्याची वैशिष्ट्ये** .......... **11**

**१.६ लोकसाहित्याचे प्रकार** .......... **12**

१.६.१ लोककथा .......... **12**

१.६.२ लोकगीते .......... **13**

१.६.३ वाक्प्रचार .......... **13**

१.६.४ म्हणी .......... **13**

१.६.५ लोकनृत्य .......... **14**

१.६.६ लोकनाट्य .......... **14**

**१.७ लोकसाहित्य आणि लोककथा** .......... **15**

**१.८ लोककथांचे क्षेत्र** .......... **16**

**१.९ लोककथेचे प्रकार....................17**

१.९.१ दैवतकथा....................17

१.९.२ परिकथा....................17

१.९.३ उत्पत्ती कथा....................17

१.९.४ दंतकथा....................17

१.९.५ प्राणीकथा....................17

१.९.६ हास्यकथा....................18

१.९.७ वीरकथा....................18

१.९.८ अनुभवकथा....................18

**१.१० लोकसाहित्य आणि लोककथा परंस्पर संबंध....................18**

**१.११ समारोप....................19**

**१.१२ निष्कर्ष....................19**

**संदर्भ....................19**

## प्रकरण १

# लोकसाहित्य आणि लोककथा

### प्रास्ताविक

लोकसाहित्य या विषयाला देशातच नव्हे तर जगामध्ये महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे. जेव्हा मुद्रण यंत्रणा सुरू झाली तेव्हा मौखिक परंपरेचे संग्रहण आणि मुद्रण हे मोठ्या प्रमाणात होऊ लागले. पारंपरिक साहित्याचा अभ्यास संस्कृतीचा शोध घेण्यासाठी होऊ लागला. 'Folklore' या शब्दासाठी 'लोकसाहित्य' हा शब्द पर्याय म्हणून रुढ झाला. 'लोक' व 'साहित्य' असे दोन वेगळी पदे आहेत. 'साहित्य' हा शब्द 'वाङ्मय' या शब्दासाठी पर्याय म्हणून रुढ आहे. याचा अर्थ परंपरेने जे चालत आलेले लोककथा लोकगीत, म्हणी, उखाणे अशा साहित्याला लोकसाहित्य म्हटले जाते. चालीरीती, रुढी, विधी उत्सव या सर्वांना मिळून लोकसाहित्य हा शब्द वापरला जातो.

### १.१ लोकसाहित्य म्हणजे काय?

लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपात एका पिढीकढून दुसऱ्या पिढीकडे जात असते. त्यांचा कर्ता हा अनामिक असतो. इंग्रजी राजवटीत जे परदेशी लोक भारतात आले त्यांनी भारतात येऊन लोकसाहित्याचे संकलन केले, तसेच आपल्या देशातही लोकसाहित्याचे संकलन केले. लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना लोकजीवनविषयी समजून घेणे महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याची निर्मिती ही एका व्यक्तीपूर्ती मर्यादित नसते. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीतून घडलेला आविष्कार असून लोकजीवनाचा गंध त्याला असतो. लोक ही संज्ञा मुळात ग्रामीण जीवन जगत असलेल्याच लोकांसाठी नसून ती इतर लोक समूहाची असते.लोकसाहित्याची निर्मिती ही समुहनिष्ठ असते. समूहाच्या एकत्रीकरणातून लोकसाहित्य निर्माण होत असते. लोकसाहित्याचा कर्ता हा अज्ञात असतो.

इंग्रजीत **'folklore'** या शब्दाला मराठीत **'लोकसाहित्य'** म्हणतात. **दत्तो वामन पोतदार** यांनी लोकसाहित्याला लोकविद्या असा शब्द सुचविला होता पण तो रूढ झाला नाही. **रा. ची. ढेरे** यांनी लोकतत्व हा शब्द सुचविला. लोकसाहित्यातील अभ्यासकांनी इंग्रजीत 'folklore' साठी अनेक शब्द सुचविले पण शेवटी **दुर्गा भागवत** यांनी सुचवलेला 'लोकसाहित्य' हा शब्द 'folklore' साठी वापरला जातो. "लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते तरी त्याचा मूळ गाभा तोच असतो".[i] लोकसाहित्याचा संबंध इतर ज्ञानशाखेशी आहे. लोकसाहित्य हा लोक जीवनाचा व लोक संस्कृतीचा आरसा असतो.

### १.२ लोकसाहित्याची व्याप्ती

लोकसाहित्याची व्याप्ती खूप मोठी आहे. या व्याप्तीमुळे लोकसाहित्याची परंपरा ही किती व्यापक आहे हे लक्षात येते. लोकसाहित्याचा संबंध लोकजीवनाशी असल्यामुळे ज्या भाषेत व्यवहार केला जातो त्याच भाषेत त्याची निर्मिती होत असते. लोकसाहित्यात चालत आलेल्या लोकजीवनाच्या चार भागात विभागात समावेश होतो. ते पुढीलप्रमाणे आहेत.

#### १.२.१ मौखिक आविष्कार

जे शब्दबद्ध आहे त्याचा समावेश मौखिक आविष्कारामध्ये केला जातो. हा आविष्कार गद्य आणि पद्य या दोन स्वरूपातून होत असतो. गद्यामध्ये लोककथा यामधील परिकथा, दैवतकथा इत्यादींचा समावेश होतो. तर पद्य साहित्यातील लोकगीतामध्ये सामाजिक, कौटुंबिक गीतांचा समावेश होतो.[ii] यामध्ये उखाणे, वाक्यप्रचार, म्हणी इत्यादी गोष्टीचाही समावेश होतो. परंपरेने चालत आलेले मौखिक आविष्कार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित असून त्याचा कर्ता हा अज्ञान असतो. लोकसाहित्यातील मौखिक परंपरेने चालत आलेल्या साहित्याला **Verbal Art** असेही म्हणतात.

#### १.२.२ भौतिक संस्कृती

लोकसाहित्यामध्ये भौतिक संस्कृतीचाही समावेश होतो. यांत्रिकीकरणापूर्वी लोकजीवनात जी भौतिक संस्कृती होती आणि अजूनही परंपरेने चालत आहे त्या सर्वांचा यात समावेश होतो. यामध्ये कौशल्य, वेगवेगळी कौशल्य तंत्र यांचा समावेश आहे. परंपराने चालत आलेली सुतार, लोहार, कुंभार, न्हावी इत्यादी कौशल्य

तंत्राचा समावेश केलला आहे.[iii]ही कौशल्ये परंपरेने चालत आलेली असून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ती सुपूर्त होत असतात. तसेच व्यवसायातील कौशल्य, पारंपारिक व्यवसाय इत्यादी गोष्टींचाही समावेश होतो.

### १.२.३ लोकरूढी, विधी, समजुती इत्यादी

लोकसाहित्याचा तिसरा आणि मोठा असलेला विभाग म्हणजे लोकरूढी, विधी, समजुती इत्यादी होय. परंपरेने ज्या रुढी, विधी, चालत आलेल्या आहेत यांचा समावेश यामध्ये होतो. रूढी आणि विधी यांच्या मुळाशी काही लोकविश्वास, लोकभ्रम असतात. जन्म, बारसा, लग्न, इत्यादी विधी त्याचबरोबर दृष्ट काढणे, जादूटोणा, करणी या सर्वांच्या मागे कुठली तरी समजूत असते. या समजूतीचा, लोकविश्वासाचा आणि त्यानुसार केल्या जाणाऱ्या कृतींच्या मागे परंपरा आहे.[iv]

### १.२.४ प्रयोगसिद्ध लोककला

लोकसाहित्याच्या या विभागात परंपरेने लोकजीवनात होणाऱ्या लोककलांचा समावेश होतो. लोकजीवनात विधीच्या निमित्ताने होणारी लोकनृत्य, खेळ म्हणून खेळले जाणारे नृत्य तसेच मनोरंजनासाठी केली जाणारी लोकनाट्य, लोकसंगीत, घरापुढील रांगोळी, नागपंचमी. [v]अशा प्रसंगाच्या निमित्ताने होणारे सर्व प्रयोगसिद्ध लोककला असून या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. प्रयोगसिद्ध लोककलामध्ये प्रत्यक्ष सादरीकरण केले जाते.

### १.३. लोकसाहित्याच्या व्याख्या

लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करताना लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याविषयी आपल्या व्याख्या मांडल्या आहेत. काही व्याख्या पुढीलप्रमाणे -

**व्याख्या क्रमांक १)** "जोनास बॅलिस यांच्या मते, 'लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून परंपराप्राप्त असते. याचबरोबर सुसंस्कृत मानवांना देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याव्दारा पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, लोकरूढी, लोककलाप्रकार त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य, इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या

आविष्काराचे शास्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे शास्त्र आहे. [vi]

**-जोनास बॅलीस (Jonas Balys)**

**व्याख्या क्रमांक २)** "मारियस बार्डी यांनी लोकसाहित्याची संकल्पना स्पष्ट करताना त्याची व्यापकता दर्शविली आहे. 'विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रूढी तसेच व्यवहार यासंबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. त्या सर्वांस लोकसाहित्य म्हणावे."[vii]

**-मारियस बार्डी**

**व्याख्या क्रमांक ३)** "गास्टर यांच्या मते, 'लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असून तो लोकांकडून विचारपूर्वक किंवा अजाणता संरक्षिला जातो लोकासाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचा सर्वसंग्राहक असा तो घटक असतो. लोकसाहित्य हे कला व वाङ्मय यांचा स्रोत असतो. ते लोकांचे, लोकांनी निर्माण असते. त्यातून लोकांची प्रकृती आणि सर्जनक्षमता प्रकट होते. त्याचप्रमाणे त्यात व्यक्तिविशिष्टत्व नसते, तर समूहनिर्मित सर्जनक्षमता प्रभावी असते."[viii]

**-गास्टर**

**व्याख्या क्रमांक ४)** "लोकसाहित्य हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. त्याचा निर्माता अज्ञात असतो. त्याची निर्मिती कोणी तरी एक व्यक्तीकडून झालेली असली तरी निच्छित पणे त्या व्यक्तीची नाव सांगता येत नाही. त्या रचनेचे स्वरूप ही बदलते."[ix]

**-आर्चर टायलर**

## १.४ भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या

**व्याख्या क्रमांक १)** "पुरातन काळापासून चालत आलेले व बहुदा तोंडी असलेले वाडमय, गाणी, कोडी, म्हणी यांना लोकसाहित्य असे म्हणता येईल."[x]

**-चि. ग कर्वे**

**व्याख्या क्रमांक २)** "लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाङमयप्रकार नाही. उलट मौखिक आशय विधिसंबंधित कृती व अभिनय त्यांच्या व्दारे सादर केलेला तो प्रयोग असतो. तो प्रयोग श्राव्य व दृश्य असतो."[xi]

**-डॉ. गंगाधर मोरजे**

**व्याख्या क्रमांक ३)** "लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य असते. लोकसाहित्य लोकांचे असते, व्यक्तींचे कधीही नसते."[xii]

**-डॉ. प्रभाकर मांडे**

**व्याख्या क्रमांक ४)** "लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीचा अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल यांचे निरिक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे. मानव व त्यांच्या सभोवारची चराचर सृष्टी हिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासा नंतर विशेष लक्षात येते."[xiii]

**-दुर्गा भागवत**

वरील सर्व अभ्यासकांच्या व्याख्या पाहिले तर त्या वाक्यातील मला जी व्याख्या अभिप्रेत झाली ती म्हणजे डॉ. प्रभाकर मांडे यांची व्याख्या. त्यांची व्याख्या समजल्यावर माझ्या मते लोकसाहित्य म्हणजे प्राचीन काळातील परंपरा , रूढी, आहे. जी मौखिक स्वरूपाची परंपरा आहे ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित ज्ञान पोहचविणे म्हणजेच लोकसहित्य. त्याचा कर्ता जो असतो तो अज्ञात असतो.

## १.५ लोकसाहित्याची वैशिष्ट्ये

- लोकसाहित्य हे युगानुयुगे मानवाने घेतलेल्या अनुभवांचे मौखिक रूप असते.
- लोकसाहित्य हे अलिखित असते.
- लोकसाहित्य हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते.

- लोकसाहित्याची मूळ निर्मिती व्यक्तीची असली तरी ती व्यक्तीची न राहता समूहाची बनते.
- लोकसाहित्याचा मूळ निर्माता अज्ञात असतो.
- लोकसाहित्यातून लोकमानसाचा आविष्कार होतो.
- लोकसाहित्य हे ग्रामीण समाजाचे दर्शन घडविते.
- लोकसाहित्यातून परंपरा टिकवणे व पुनरुज्जीवित करणे या दोन क्रिया प्रामुख्याने घडतात.
- लोकसाहित्यातून प्राचीन समाजजीवनाचे अविनाशी अवशेष प्रकट होतात.
- लोकसाहित्यातून मनोरंजन होते.

**१.६ लोकसाहित्याचे प्रकार**

लोकजीवन हे लोकसाहित्यातून व्यक्त होते . परंपरेने चालत आलेले लोकजीवन कृतीतून प्रकट होत असते. या प्रकारात लोककथा, लोकगीत, लोकनाटय, लोकनृत्य, वाक्यप्रचार आणि म्हणी असे प्रकार आहेत.

**१.६.१ लोककथा**

मौखिक परंपरेने लोककथांचा उगम झालेला आहे. लोकसाहित्यात लोककथांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. जिथे माणूस असतो तिथे कथा ही असतात. कथा ऐकायला तर सर्वांनाच आवडतात. लोककथा ही लोकजीवनाशी प्रचलित असतात. ज्या काळात मनोरंजनाची साधने उपलब्ध नव्हती तेव्हापासून कथा रंजनाचे कार्य करीत आहे. लोककथांचा निर्माता कोण असतो हे कोणालाच सांगता येत नाही. लोककथामधून समाजजीवनाचे, धार्मिक समजुतीचे व संस्कृतीचे दर्शन घडते.[xiv] कथा ही प्रदेशानुसार बदलत जाते. पुण्य मिळविणे, संकटाचे निवारण, अंधविश्वास ही सगळी कारणे लोककथांच्या निर्मिती मागे दिसतात. लोककथेचे दोन प्रकार आहेत. कथा आणि गीतकथा. गीतकथा म्हणजे जी कथा गाऊन सांगितली जाते.

### १.६.२ लोकगीते

मौखिक परंपरेने पिढ्यान पिढ्या संक्रमित होत असलेल्या गीतांना लोकगीते असे म्हणतात. लोकगीते जी असतात ती एका समुहगटाकडून निर्माण झालेल्या असतात. या गीतांमधून लोकमानस, त्यांची विचारप्रणाली, कल्पनावैभव, नीतीधर्म यांचे चित्रण झालेले दिसते. मराठी लोकसंस्कृतीचे चित्रण, विविधता, भावोत्कटता आणि मानवी जीवनातील अनेक प्रसंगांचे हृदयस्पर्शी चित्रण लोकगीतात आढळते. समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती, परस्पर मानवी संबंध यांचा आविष्कार लोकगीतातून आढळतो. [xv]

### १.६.३ वाक्प्रचार

लोकजीवनातून वाक्प्रचाराची निर्मिती होत असते. लोकजीवनातील अनुभवाची परंपरा वाक्प्रचारांच्या मागे असलेली दिसते. वाक्प्रचाराच्या रचनेच्या दृष्टीने म्हणीशी नाते असते. वाक्प्रचारात कमी शब्दांचा उपयोग केलेला असतो. [xvi]

वाक्प्रचारातील शब्दांना मूळच्या अर्थापेक्षा वेगळा अर्थ लाभलेला असतो. ऐकणाऱ्याला व उच्चारण करणाऱ्याला त्याचा अर्थ माहीत असला पाहिजे. त्यामुळे वाक्प्रचाराचे संदर्भ सहजतेने लक्षात येतात . लोकांच्या अनुभवातून हे वाक्प्रचार निर्माण होत असतात. वाक्प्रचाराचा कर्ता कोण आहे आणि ते कसे निर्माण झाले याबद्दल कोणालाही सांगता येत नाही.

### १.६.४ म्हणी

लोकव्यवहारात एखाद्या भाषेचा वापर किती विविध प्रकारे जातो आणि आशयाची अभिव्यक्ती किती समर्थपणे केली जाते त्यावर त्या भाषेचे सामर्थ्य अवलंबून असते. व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या म्हणी आपल्याला कितेकदा वेळोवेळी भेटत जावून राहतात आणि त्याचा आपण वापर करीत राहतो.[xvii] उदाहरणार्थ: कामा पुरती मामा, अती तेथे माती इत्यादी.

भाषेला अधिक सौदर्य प्राप्त करून देण्यासाठी तिचा वापर महत्वाचा ठरतो. म्हणी मध्ये एक प्रकारची काव्य दडल्यामुळे ती लक्षात ठरणे सोपे जातात. म्हणी म्हणजे लोक संबंधी बोलण्या मध्ये ज्याचा वारोवार

वापर केला जातो त्या वेळी आपले बोलणे इतरांच्या मनावर प्रभाव करून जाते. मानवाच्या चांगल्या वाईट प्रवृत्ती, आचार- विचार इत्यार्यांची प्रतिबिंबता त्यात दिसते.

समाजातील सर्व लोकांना म्हणी आवडतात. या म्हणी भरपूर प्रमाणात वापरल्या जातात. तिची मुळ गाभा लोकभाषेत आहे .अनुभवांचा आचारावर त्यांची निर्मिती झाली. दैनदिन जीवनातून म्हणी निर्माण झाल्या आणि त्या म्हणी रूढ ही झाल्या. म्हणींचा कोणीही कर्ता नाही. भाषेची परंपरा जितकी जुनी आहे तितकीच म्हणीची परंपरा जुनी आहे. म्हणींना प्राचीन अशा प्रकारची परंपरा आहे.

**१.६.५ लोकनृत्य**

लोकनृत्य हा लोकजीवनात परंपरेने चालत आलेला  एक कलात्मक प्रकार आहे. सण- उत्सव प्रसंगी विविध जमातीतील लोक एकत्र येवून आनंद व्यक्त करण्यासाठी जे नृत्य सादर करतात त्यास लोकनृत्य म्हणतात. 'आदिमानव काळापासून नृत्ये ही सांस्कृतिक वैशिष्ट्याचा आविष्कार असून जीवनातील आनंदाचा आविष्कार करण्याचे ते एक माध्यम आहे. भूतकालीन जीवनाशी त्याचे नाते असते.'

जनसाम्यांना मध्ये प्रचलित असलेल्या परंपरागत लिखित नृत्य प्रकार म्हणजेच लोकनृत्य. लोकनृत्य हे नैसर्गिक वातावरणात म्हणजेच मोकळ्या मैदानावर, गावाबाहेर, देवळाच्या मंडपातील आवारात या प्रसंगी हा नृत्य साजरा केला जातो. म्हणजे हे नृत्य आपल्या समाजातील विविध बांधव एक आनंद उत्सव साजरा करण्यासाठी हे नृत्य प्रकार करतात.

लोकनृत्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या नृत्यात पारंपारिक वाद्यांची आणि पोषाकांचा वापर केला जातो. आपल्या बोली भाषेतील गीतांचा लोकनृत्यात वापर होतो. लोक संगीताचा तसेच लोकांच्या दैनदिन कामाचा प्रभाव या नृत्यात पहायला मिळतात.

**१.६.६ लोकनाट्य**

लोकनाट्ये ही विविध विधी व उत्सवांतून निर्माण झाली. खेड्यातील देवालयांच्या मंडपात रस्त्याकडेच्या मोकळ्या आवारात व पटांगणात लोकनाट्याचे खेळ केले जातात. लोकनाट्यला लिखित संहिता नसते . ते संवाद जे असतात ते मौखिक परंपरेने आलेले असतात व कल्पनेने आठवून  म्हटले जातात.

त्यांना कित्येकदा मौखिक परंपरेतील कंठसंगीताचाही जोड असते. धर्मश्रद्धेतून पारंपारिक निर्माण झालेली नाट्यरूपे समाजात टिकून राहतात.

नाट्याची ही परंपरा आदिम काळापासून चालत आलेली परंपरा आहे लोक माणसाचा अविष्कार करणारी नाट्यकला ही नृत्यकलेतून जन्माला आल्याचेही एक मत आहे डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते तर " विधी चार चौघासमोर किंवा समूहामध्ये जेव्हा करण्यात येऊ लागते तेव्हा त्याचे स्वरूप नाटकी झाले". यात मनोरंजनाला अधिक महत्त्व येते. विधिनाट्याला लौकिक नाट्याचे म्हणजे लोकनाट्याचे स्वरूप प्राप्त होते. त्याला 'लोकनाट्य' असे म्हणता येते.

आजही आदिवासी भागात सण-उत्सव, समारंभ, विधी प्रसंगी लोकनाट्ये खेळली जातात. जत्रेच्या वेळी होणारा तमाशा, विवाहानंतर, बोहाडा हे नाट्यप्रकार  निर्माण होणाऱ्या व्यावसायिक नाटकापेक्षा वेगळे आहेत.

**१.७ लोकसाहित्य आणि लोककथा**

लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. लोककथा हा एक लोकसाहित्याचाच भाग आहे. लोककथा म्हणजे पारंपारिक आणि परंपरेने बोलीभाषेत असलेली कथा होय. लोकसाहित्या प्रमाणेच लोककथा लोकनिर्मित आणि लोकांनीच राखलेली असते. एखादी प्रमुख घटना किंवा प्रसंग लोकांच्या मनावर बिंबलेला असतो तो लोककथेमध्ये प्रचलित होत जातो. या कथा पूर्वी लिखित स्वरूपात आढळत नसे. कथाकार आपल्या माहिती प्रमाणे त्यात बदल करत जातो. त्यामुळे मुळे कथेसोबत उपकथा निर्माण होत जातात. काही कथा इतिहास विषयक संदर्भ देतात परंतु त्याचे पुरावे नसतात. लोकसाहित्यात लोककथांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. कथा ऐकायला तर सर्वांनाच आवडतात. लोककथा ही लोकजीवनाशी प्रचलित असतात. लोककथांचा निर्माता कोण असतो हे कोणालाच सांगता येत नाही.

## **१.८ लोककथांचे क्षेत्र**

लोककथांचे संकलन करण्यासाठी मी धारबांदोडा तालुका हे क्षेत्र निवडले आहे. धारबांदोडा हा पूर्वी सांगे तालुक्याचा एक भाग होता. नंतर २०१० रोजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी विधानसभेत त्यांच्या भाषणात धारबांदोडा हा गोव्यातील १२ वा तालुका म्हणून घोषीत केले. ४ एप्रिल २०११ रोजी **धारबांदोडा** हा तालुका दक्षिण गोवा जिल्ह्याचा एक भाग म्हणून अस्तित्वात आला. या तालुक्यात १६ गाव आहे. धारबांदोडामध्ये अनेक पर्यावरणीय पर्यटनस्थळे आहेत. प्रसिद्ध दुधसागर धबधबा कुळे या गावात आहे. मोले येथे बायोडायव्हर्सिटी प्रसिद्ध आहे. धारबांदोडा तालुक्यात महादेव मंदिर, तांबडी हिज सुर्ला, सातेरी मंदिर, दुधसागर आजोबा देवस्थान यासारखी अनेक प्रमुख मंदिरे आहेत.

धारबांदोडा हा तालुका प्रदीर्घ असून येथे अनेक जातीचे लोक राहतात. तसेच गावामध्ये सातेरी, शांतादुर्गा, महादेव अशी मंदिरे आहेत. या मंदिरांची जत्रा मोठया उत्साहाने करतात. धारबांदोडा तालुका हा शेतांनी, कुळाघरांनी भरलेला आहे. या तालुक्यातील **कुळे** या गावात दुधसागर धबधबा आहे. तो पहायला अनेक पर्यटक येतात. दुधसागर धबधबा जवळ आजोबाचे मंदिर आहे. त्या आजोबाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतात. तो आजोबा राखणदार म्हणून मानले जाते. तसेच शिगाव या गावात सातेरी देवीचे मंदिर आहे. मंदिराच्या बाजूला खाली नदी असून तेथेच बाजूला एक गुहा आहे. या गुहेत पूर्वी पांडव राहून गेले असे लोक सांगतात. त्या गुफेत पांडवांची "शिताची वाणी" आहे. तसेच तांबडी सूर्ला येथे महादेव मंदिर आहे. सोमवारी तेथे पुजा करण्यासाठी अनेक लोक येतात. शिवरात्रीला या मंदिरात बाहेरील गावातील लोकांची प्रचंड गर्दी असते.

संकलन करण्यासाठी मी धारबांदोडा तालुक्यातील काही गावांना भेट दिली. धारबांदोडा, कुळे, मोले, शिगाव, बांडोळी, सार्कोडा आदि या गावात जाऊन संकलन केले. या गावातील लोक खूप प्रेमळ आहेत. त्यांनी चांगल्या प्रकारे मला कथा सांगितल्या तसेच गावाबद्दल माहिती ही सांगितली.

## १.९ लोककथेचे प्रकार

लोककथेचे अनेक प्रकार आहेत. दैवतकथा, परिकथा, उत्पत्ती कथा, दंतकथा, बोधकथा, हास्यकथा, वीरकथा व अनुभव कथा इत्यादी .

### १.९.१ दैवतकथा

ज्या कथा देवतांच्या संबंधीत असतात त्या कथांना दैवतकथा असे म्हणतात. दैवतकथा या प्रचीन कथा अरून त्यांना पुराणकथा असेही म्हटले जाते. दैवतकथा धर्माशी संबंधित असतात. धार्मिक रुढी, विधी या मागची कारणे दैवतकथेमध्ये आढळताना. देवतांचे जन्म, त्यांचे अवतार, सृष्टीची उत्पत्ती, रचना, देवी देवतांची वर्णने दैवतकथेमध्ये आढळतात.

### १.९.२ परिकथा

परिकथेला अद्‌भुतकथा असे म्हणतात. कथेत पुरुष किंवा स्त्री मुख्य व्यक्ती असून त्या व्यक्तीभोवती अनेक प्रसंगांची, चमत्कारांची उभारणी केलेली असते. कथेची सुरुवात दुःखाने होऊन शेवट मात्र आनंदात होतो. या कथेचे मूळ प्रयोजन मनोरंजन करणे आहे. मनोरंजनाच्या हेतूने निर्माण झालेल्या कथा असतात.

### १.९.३ उत्पत्ती कथा

मानवाचा जन्म,सृष्टीची रचना, स्त्री व पुरुष भेद कसे निर्माण झाले या सगळयांचे कारणे उत्पत्ती कथेमध्ये येतात. या कथा दैवत कथा प्रमाणेच धर्माशी निगडित असते. उत्पत्ती कथेचे स्वरूप काल्पनिक असते.

### १.९.४ दंतकथा

दंतकथा या ऐतिहासिक सत्य घटना असतात. दंतकथांना ऐतिहासिक आख्यायिका असेही म्हणतात. ऐतिहासिक व्यक्ती किंवा घटना या संदर्भात घडलेली कथा असते. मौखिक परंपरेने कथांचे स्वरूप बदलते. काही कथा एका स्थळाशी, व्यक्तीशी किंवा वस्तूशी संबंधित असते.

### १.९.५ प्राणीकथा

या कथा काल्पनिक स्वरूपाच्या असतात. तसेच कथेतून बोध दिला जातो. यात कथांना बोध कथा असेही म्हटले जातात .प्राणीकथा ह्या प्राण्यांवर अवलंबून असतात. प्राण्यांबद्दल मानवांना कुतुहल असते.

त्यामुळेच त्यांचे स्वभाव, त्यांचे जीवन माणसाला कळू लागले. त्यातूनच प्राण्यावरील कथांची निर्मिती झाली. प्राणीकथा ज्या असतात त्या आकाराने लहान असतात. वाघ, कोल्हा, उंदीर, ससा, कासव अशा अनेक प्राण्यांवर लोककथा आहे. उदाहरणार्थ: आळशी ससा आणि हुशार कासव या कथेतून चांगला बोध दिलेला दिसून येते.

### १.९.६ हास्यकथा

विनोद निर्मिती करण्यासाठी ज्या लोककथा सांगितल्या जातात त्या कथांना हास्यकथा असे म्हणतात. लोककथांचा हेतू रंजन असल्यामुळे विनोदी लोककथा निर्माण झाल्या. या कथा आकाराने लहान असतात. या कथांमध्ये शरीर, मानसिक, मूर्खपणा या घटनावर आधारलेली असते. मराठीमध्ये हास्य कथांचे प्रमाण खूपच आहे. मूर्ख नोकराची कथा असे हास्यकथांची उदाहरणे देता येतात.

### १.९.७ वीरकथा

ज्या कथातून व्यक्तीच्या पराक्रमाचे वर्णन येते त्या कथांना वीरकथा असे म्हणतात. तसेच पराक्रमकथा ही म्हटले जातात. ऐतिहासिक व्यक्तीच्या पराक्रम कथा मौखिक परंपरेने लोकजीवनात आढळते. एखाद्या गावातील पराक्रमी व्यक्तीचे त्यांच्या जीवनातील घटनाच्या आधारे वर्णन कथेतून पहायला मिळते. पराक्रमी व्यक्तीविषयी आदर व्यक्त करणे, त्यांची प्रशंसा करणे या कारणामुळे कथेची निर्मिती होते.

### १.९.८ अनुभवकथा

या कथेत व्यक्ती स्वतःच्या जीवनात घडलेल्या घटनेवर गोष्ट सांगतो. व्यक्तीच्या जीवनातील अनुभवांवर आधारित कथा असते. अनेक वेळा व्यक्ती ज्या कुळाची असते त्यांच्या पूर्वकालीन घटनांवर आधारलेली गोष्ट सांगते.

### १.१० लोकसाहित्य आणि लोककथा परंस्पर संबंध

लोकसाहित्याचे अनेक प्रकार आहेत. लोकसाहित्य हे व्यापक आहे. जसे लोकगीत, लोकनाट्य, लोकनृत्य, म्हणी, वाक्यप्रचार या प्रकारातून समाजजीवन दर्शवते तसेच लोककथातून दर्शविले जाते. लोककथा हा लोकसाहित्याचाच एक प्रकार आहे. लोकसाहित्य आणि लोककथा यांचा कर्ता कुणालाही

माहित नसतो. कर्ता जो असतो तो अनामिक असतो. लोकसाहित्य हा मौखिक परंपरेने चालत आलेला वाङमय प्रकार आहे. त्याचप्रमाणे लोककथाही मौखिक स्वरूपात आहे. यात प्रदेशानुसार बदल होत असतो.

### १.११ समारोप

या प्रकरणात लोकसाहित्याचा अभ्यास करताना लोकसाहित्याची व्याप्ती लक्षात येते. लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात पाच्छात्य देशात झाली. भारतामध्ये लोकसाहित्याच्या अभ्यासाचा प्रारंभ ब्रिटीशाच्या आगमनाने झाला. परंपरा, लोकजीवन लोकसाहित्यातून प्रकट होत असतात. लोककथा हा एक लोकसाहित्याचाच प्रकार आहे. लोककथा या लोकजीवनाच्या संबंधीत असतात. लोककथांच्या अंतर्गत अनेक प्रकार येतात. दैवतकथा, दंतकथा, प्राणी कथा, अदभूतरम्य कथा, उत्पत्ती कथा, वीरकथा, हास्यकथा, अनुभव कथा इत्यादी कथांचे स्पष्टीकरण दिलेले आहेत. लोककथांचा संबंध लोकांच्या जीवनाशी असतो.

### १.१२ निष्कर्ष

१) लोकसाहित्यातून लोकजीवनाचे दर्शन घडते.

२) लोकसाहित्य हे एकटयाचे नसून सर्व लोकांचे असते.

३) लोकसाहित्यातून प्रकट होत असलेल्या पारंपारिक आचार विचार, पुढे दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविणे महत्वाचे आहे.

४) लोककथा जी आहे ती लोकजीवनाशी निगडीत असते.

५) जिथे लोक असते तिथे लोककथा आढळतात.

६) लोककथेच्या अभ्यासातून, परंपरा, अंधश्रद्धा, संकटाचे निवारण, श्रद्धा या सगळयांचा प्रभाव लोकजीवनावर पडलेला दिसतो.

### संदर्भ सूची

[i] गमे डॉ भाऊसाहेब , लोकसाहित्याचे संशोधन, प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती,२०१६ पृ. कृ २३

[ii] कालाभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, पहिली आवृत्ती, २००७, पृ. क्र २५

[iii] तत्रैव

[iv] कालाभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, पहिली आवृत्ती, २००७, पृ. क्र २५ व २६

[v] कालाभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, पहिली आवृत्ती, २००७, पृ. क्र २६

[vi] शिवाजी विद्यापीठ- लोकसाहित्य व लोककला- एम.ए. भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र ३

[vii] तत्रैव

[viii] शिवाजी विद्यापीठ- लोकसाहित्य व लोककला- एम.ए. भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र ६

[ix] शिवाजी विद्यापीठ- लोकसाहित्य व लोककला- एम.ए. भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र ५

[x] शिवाजी विद्यापीठ- लोकसाहित्य व लोककला- एम.ए. भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र ७

[xi] तत्रैव

[xii] शिवाजी विद्यापीठ- लोकसाहित्य व लोककला- एम.ए. भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र ७

[xiii] शिवाजी विद्यापीठ- लोकसाहित्य व लोककला- एम.ए. भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र ८

[xiv] मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती दुसरी आवृत्ती,१९८९, पृ. क्र.१७४

[xv] मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती  दुसरी,१९८९, पृ. क्र.१२८

# प्रकरण दुसरे

# धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृती व जीवन

प्रास्ताविक ........ 23
२.१ गोमंतकातील धारबांदोडा तालुका ........ 23
२.१.१ भौगोलिक गोवा ........ 23
२.१.२ सांस्कृतिक गोवा ........ 24
२.१.३ धारबांदोडा तालुका ........ 25
२.१.४ भौगोलिक सीमारेषा ........ 25
२.१.५ सामाजिक धारबांदोडा तालुका ........ 25
२.१.६ सांस्कृतिक धारबांदोंडा तालुका ........ 25
२.२ धारबांदोडा तालुक्यातील लोक ........ 26
२.२.१ धनगर ........ 26
२.२.२ गावडा ........ 27
२.२.३ देवळी ........ 27
२.२.४ नाईक- वेळीप ........ 27
२.२.५ कुळमी ........ 27
२.२.६ नाईक भंडारी ........ 28
२.२.७ सुतार ........ 28
२.३ धारबांदोडा तालुक्यातील लोकांचे जीवन ........ 28
२.३.१ निर्सग, वनस्पती आणि प्राणी ........ 29

२.३.२ व्यवसाय आणि उत्पन्न ....................29
२.३.३ लोकसमजुती ....................30
२.३.३.१ भूताविषयी समजुती ....................30
२.३.३.२ दृष्टीबाधा विषयी समजुती ....................31
२.३.३.३ आचार, श्रद्धा विषयी समजुती ....................31
२.३.३.४ अशुभ विषयी समजुती ....................32
२.३.३.५ काही इतर समजुती ....................32
२.४ धारबांदोडा तालुक्यातील सण उत्सव ....................32
२.४.१ महाशिवरात्री ....................33
२.४.२ दिवाळी ....................33
२.४.३ गणेश चतुर्थी ....................34
२.४.४ वडा पुनव ....................35
२.४.५ नागपंचमी ....................35
२.५ समारोप ....................35
२.६ निष्कर्ष ....................36
संदर्भ सूची ....................36

# प्रकरण दुसरे

# धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृती व जीवन

## प्रास्ताविक

‘धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृती व लोकजीवन’ या विषयाअंतर्गत येथे अभ्यास अभिप्रेत आहे. हा अभ्यास करायचा असेल तर सर्वांत अगोदर गोमंतकाविषयी तसेच गोमंतकातील धारबांदोडा तालुका या विषयी समजून घेणे आवश्यक आहे.

पहिल्या प्रकरणात लोकसाहित्याची सैद्धांतिक मांडणी केलेली आहे. सदर प्रकरणात धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृती व जीवन याच्याविषयी जाणून घेणे महत्वाचे आहे. धारबांदोडा तालुक्यातील भौगोलिक सीमारेषा, सामाजिक धारबांदोडा , सांस्कृतिक धारबांदोडा, धारबांदोडा तालुक्यातील लोक, त्यांचे जीवन, निर्सग, व्यवसाय, लोकसमजुती, सण, उत्सव अशा विषयांची विवेचना इथे केली जाणार आहे.

## २.१ गोमंतकातील धारबांदोडा तालुका

भारताच्या नकाशावर छोटा दिसणारा पण समृद्ध असा भूभाग म्हणजे गोवा. गोवा भारताच्या दक्षिण भागातील पच्छिम किनाऱ्यावर वसलेले राज्य आहे. निर्सगाने असा नटलेला प्रदेश. चोहिकडे समुद्र, नद्या व उंच उंच डोंगराने भरलेला असा प्रदेश आहे.

‘गोवा’, ‘गोमंत’, ‘गोमन्तक’ अशी  नावे या प्रदेशाला दिलेली आढळतात. तसेच ‘गोपराष्ट’, ‘गोवराष्ट्र’ अशी ही काही नावे संबोधलेली आहे.

### २.१.१ भौगोलिक गोवा

गोवा हे भारतीय संघ राज्यातील पंचविसावे राज्य आहे. गोवा हा भारताच्या दक्षिण भागातील किनाऱ्यावरचे राज्य आहे. त्याच्या उत्तर भागात महाराष्ट्र आहे. तर दक्षिण पूर्वेकडच्या भागात कर्नाटक राज्य

आहे. अशा गोवा राज्याच्या सीमा आहेत. गोव्याची लोकसंख्या २०१९ च्या जनगणनेनुसार १४,५७,७२३ इतकी आहे.

१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगीजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. तेव्हा 'दमण' आणि 'दीव' मिळून गोवा एकच केंद्रशासित प्रदेश बनला. त्यानंतर पुढे 'दमण' आणि 'दीव' हे भाग बाजूला काढून गोवा हे भारताचे एक स्वतंत्र राज्य बनले. पणजी ही गोव्याची राजधानी आहे. गोव्यात आता बारा तालुके व दोन जिल्हे आहेत.

गोव्याच्या पूर्वेकडील भागात सह्याद्रीचे उंच डोंगर आढळतात. 'दुधसागर' येथील ३९० फूट धबधबा पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. 'हरवळे' येथे धबधबा आहे. उत्तर गोव्यात वाघेरी, मोर्ले गड असे उंच डोंगर आहेत. दक्षिण भागात फोंडा येथे सिद्धनाथ, पारोडा येथे चद्रेश्वर भूतनाथ हा पर्वत आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांत येण्यासाठी व जाण्यासाठी अनेक 'घाट' आहेत. उदाः अनमोड घाट, चोर्ला घाट

गोव्यात 'मांडवी','जुवारी','तेरेखोल' अशा महत्त्वाच्या नद्या आहेत. गोव्यातील मांडवी नदी ही सर्वांत जुनी नदी आहे. गोव्यात तलाव ही आहे.

नंतरच्या काळात गोव्याच्या तांबड्या मातीत असणाऱ्या लोह (Iron) धारंचा शोध लागला. शोध लागल्याने डोंगरांना विशेष महत्व प्राप्त झाले. जंगलतोड मोठ्या प्रमाणात झाली. ती माती गोव्या बाहेर जाऊ लागली. यामुळे गोव्याला आर्थिक लाभ झाला. निर्सगावर त्याचा मोठा परिणाम झाला. 'खाण' व्यवसायामुळे अनेक जमिनी नापिक बनल्या.

### २.१.२ सांस्कृतिक गोवा

गोव्याची परंपरा सम्रुध्द आहे. विविध संस्कृतीचा वारसा तिच्याकडे आहे. गोव्याची संस्कृती ही पोर्तुगीज आणि भारतीय संस्कृतीचे मिश्रण आहे. कोंकणी ही गोव्याची राजभाषा आहे. शेती व मासेमारी हे गोव्यातील प्रमुख उद्योग आहेत. गोव्यात आज अनेक लोक मासे विकून आपले  पोट भरतात.

गोव्यात 'दिवाळी', 'गणेशोत्सव', 'शिगमा', ' दसरा' हे सगळे सण  उत्सहाने साजरा करतात. संगीत व नृत्य हे गोव्याच्या संस्कृतीवर रूजलेले आहे. गोव्यातील लोकप्रिय असलेला नृत्य प्रकार म्हणजे ' फुगडी'

आहे. जे पारंपरिक नृत्य आहेत. ' शिगमा' नृत्य करताना लोक ढोल, ताशा वाजवून सादर करतात. गोव्याची संस्कृती ही विविधतेने नटलेली आहे.

### २.१.३ धारबांदोडा तालुका

गोवा हे भारताचे लहान राज्य आहे. गोव्यात उत्तर आणि दक्षिण असे दोन जिल्हे आहेत. 'पेडणे', 'बार्देझ', ' बिचोलीम', 'सत्तरी', 'तिसवाडी', 'फोंडा', 'मुरमगाव, 'सासष्टी', 'काणकोण', ' सांगे', 'केपे', व 'धारबांदोडा' असे बारा तालुके आहेत. या बारा तालुक्यापैकी मोठा तसा तालुका म्हणजे धारबांदोडा तालुका.

### २.१.४ भौगोलिक सीमारेषा

२५ मार्च २०१० रोजी गोव्याचे मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी गोवा विधानसभेत त्यांच्या भाषणात 'धारबांदोडा' तालुका हा गोव्यातील बारावा तालुका निर्माण करण्याची घोषणा केली होती.

४ एप्रिल २०११ रोजी 'धारबांदोडा' तालुका हा दक्षिण गोवा जिल्हाचा एक भाग म्हणून अस्तित्वात आला. १६ मार्च २०११ मध्ये गोवा सरकारने आगलोट, बांदोळी, कॅमरकोडा, कारन झोल, कोडली, कुळे, करमणे, धारबांदोडा, मोले, मोईसाल, पिलीम, सार्कोडा, सांगोड, शिगाव, सोनौली आणि सुर्ला या सर्व गावांना अधिसूचित केले. गाजे आणि उसगाव ह्या दोन गावांचा समावेश धारबांदोडा तालुक्यात केला होता पण त्या गावातील लोकांनी त्या गोष्टीचा विरोध केला. नंतर गाजे व उसगाव हे गाव फोंडा तालुक्याला परत केले.

### २.१.५ सामाजिक धारबांदोडा तालुका

२०११ च्या जनगणेनुसार, धारबांदोडा तालुक्याची लोकसंस्था ३०,००० ते ४०,००० आहे. धारबांदोडा तालुक्यात अनेक जाती – जमातीचे लोक राहतात. धारबांदोडा तालुक्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तसेच काही लोक कुळाघरात सुपारीची पिक करतात. पूर्वी प्रमाणे धारबांदोडा तालुक्यातील लोक अशिक्षित नाही. तेथे बराच बदल आलेला पहायला मिळतो.

### २.१.६ सांस्कृतिक धारबांदोंडा तालुका

धारबांदोडा तालुक्यामध्ये अनेक जाती, धर्मांचे लोक राहतात. प्रत्येक समाजाची वेगवेगळी संस्कृती आहे. प्रत्येक समाजाचे लोकसाहित्य वेगळे आहे.

धारबांदोडा तालुक्यात अनेक सांस्कृतिक स्थळे आढळतात. धारबांदोडा तालुक्यातील 'तांबडी सुर्ला' येथील श्री महादेव मंदिर हे जागतिक वारसा लाभलेले स्थळ म्हणून जगप्रसिद्ध आहे. हे स्थळ जगप्रसिद्ध असल्याने देश- विदेशातून पर्यटक मोठ्या संख्येने भेट देण्यासाठी इथे येत असतात. सुट्टीच्या दिवसात पर्यटकांची मोठ्या प्रमाणात मंदिराच्या परिसरात गर्दी असते. शिव मंदिर हे सह्याद्री पर्वताच्या हिरव्यागार वनराईत वसलेले असल्याने मंदिराच्या सौंदर्यात कमालीची कर पडते. शिव मंदिराच्या सभोवताली आकर्षक बागेची रचना केलेली आहे. बाजुला पुढे 'झर' आहे. निर्सगाचे अद्भूत दृष्य लाभल्यामुळे पावसाळ्यात पर्यटक मंदिराकडे आकर्षित होत असतात.

अनमोड घाटाच्या पायथ्याशी 'दुधसागर' धबधबा पावसाळ्यात ओतप्रोत भरून वाहत असतो. धबधब्याला निर्सगाने चोहीबाजूने वेढल्याने तो पर्यटकांना आकर्षित करत आहे. धारबांदोडा तालुक्यातील लोकांनी देवाला मारलेली देव हाकेला पावतो. अशी धारणा आहे.

### **२.२ धारबांदोडा तालुक्यातील लोक**

या प्रकरणात धारबांदोडा तालुक्यातील लोकसाहित्यातील 'लोक' म्हणजे काय? यावर चर्चा करणार आहेत. धारबांदोडा तालुक्यातील बहुतांशी *लोकसंख्या* ही लोकसाहित्यातील 'लोकमध्ये' समाविष्ट होते. यामध्ये तालुक्यातील ' लोक' या शब्दांचे स्वरूप जाणून घ्यायचे आहे.

#### **२.२.१ धनगर**

धनगर ही जात खरे म्हणजे ही एक जात नसून तिच्या बाबीस पोटजाती आहेत. त्या पैकी काही जाती भटक्या असून काही स्थायिक झाल्या आहेत. धनगर ही जात द्राविड वंशीय असल्याचे मानले जाते. धारबांदोडा तालुक्यात मोले, धारबांदोडा, शिगाव, बांडोळी, इत्यादी गावात ' धनगर' ही जात आढळते. पूर्वी ' धनगर' ही जात भटकत होती. व आता धारबांदोडा तालुक्यातील काही गावात स्थानीक झाले आहेत. गाई म्हशी पाळणे हा त्यांचा मूळ व्यवसाय. त्यातच शेळया – मेंढया पाळण्याच्या व्यवसायाची भर पडली.

### २.२.२ गावडा

'गावडा'ही जमात धारबांदोडा तालुक्यातील सार्कोर्डा व धारबांदोडा या गावात त्यांचे वास्तव आहे. गावडा ही जमात पूर्वी भटकत होते. गावडा जमातीचे लोक रानात राहत होते. आता सर्व  जमातींप्रमाणे ती रानावनांत राहात नसून, गावात एक तर स्वत:च्या एका वेगळ्या गावठाणात राहते किंवा जमीनदारांच्या भाटात-माडांच्या बागायतींत राहते. गावडा समाज हा मागासलेला आहे. आर्थिक व सामाजिक या दोन्ही दृष्ट्यानी.

### २.२.३ देवळी

देवळी जातीचे जे लोक असतात ते देवाची सेवा करणारी असतात. ते देवळाच्या बाजूला राहतात. सकाळ झाली की ते देवळात जाऊन झाडू मारून जमीन पुसून काढतात. देवीच्या पुजेची भांडी- नदीवर जावून स्वच्छ करायचे. देवळी जातीचे लोक जे असतात ते देवांचे सेवक असतात. त्यांची सेवा करण्यासाठीच ते आलेले. असे गावातील लोक सांगतत.

### २.२.४  नाईक- वेळीप

नाईक वेळीप ही जात कमी प्रमाणात आहे. ही जात भंडारी समाजात येते. नावाच्या शेवटी आडनाव लावताना 'वेळीप' लावतात पण म्हणतात 'नाईक वेळीप'. 'धारबांदोडा' तालुक्यात 'शिगाव' येथील नाईक-वेळीप आडनावांचा वाडाच आहे.  तिकडे वेळीप जास्त राहतात म्हणून त्या वाड्याला वेळीपवाडा असे म्हटले जाते.

### २.२.५ कुळमी

गोमंतकातील कुळमी ही जात सर्वांत मोठी लोकजमात आहे. ही जात गोमंतकातील वनक्षेत्रात व डोंगराळ परिसरात प्रामुख्याने आढळते. ही जमात अत्यंत वैशिष्टपूर्ण अशी 'लोकजमात' होय. या जातीत वेळीप, गावकर, या जाती आढळतात. धारबांदोडा तालुक्यात काही गावांनी कुळमी जात आहे. शिगाव गावात ' माटोजे मेढे' या वाड्यात वेळीप, गावकर, , गावकर- सावंत  अशा कुळमी जातींचे लोक राहतात. वेळीप , गावकर , नावे वेगळी असली तरी या उपजातीत कोणताही फरक जाणवत नाही. एकाच जमातीतील काही

लोक बुद्धीचे काम करू लागले. गावकर जमातीचे लोक दुसऱ्या लोकांच्या समस्या दूर करू लागल्या. गावकर लोकांना देवळात मान दिला जातो. गावकर देवळात पूजा करतात.

### २.२.६ नाईक भंडारी

गोव्यात आढळणारा भंडारी समाज हा नाईक हे कुठुंब नाम स्वीकारलेला आहे. गोव्यात मोठ्या प्रमाणात आढळणारा हा समाज धारबांदोडा तालुक्यात मोठ्या प्रमाणात आढळतो. धारबांदोडा तालुक्यात कुळे, शिगाव, करमणे या गावात नाईक समाजाचा  स्वीकार केलेला आढळतात.

### २.२.७ सुतार

धारबांदोडा तालुक्यातील काही गावात सुतार ही जात आहे. या जातीचे लोक नावाच्या शेवटी च्यारी, सुतार अशी आडनावे लावतात. त्यांच्या मुख्य व्यवसाय म्हणजे लाकडापासून दरवाजा तयार करणे. त्यांना 'मेस्त' असेही म्हटले जाते. ते लोकामध्ये समाविष्ट झालेले आहे.

## २.३ धारबांदोडा तालुक्यातील लोकांचे जीवन

"लोकसंस्कृती हा लोकसाहित्याच्या अभ्यासाचा महत्वाचा घटक आहे. लोकगीते, लोककथा, लोकनृत्ये, सण सोहळे, धार्मिक विधी समजून घेण्यासाठी आधी लोकसंस्कृती समजून घेतली पाहिजे. माणूस हा भोवतालच्या निसर्गामध्ये जीवनाच्या अनुकूल असे बदल करून त्यावर संस्कार करून आपले जीवन सुखमय आणि समृद्ध बनवितो. त्याबरोबरच तो स्वतःचे मन, बुद्धी यांचा चांगला वापर करतो. त्यांच्यावरही संस्कार करतो. जीवनाच्या चांगल्या अवस्थेचे परंपरेने वाढत जाणारे प्रतीक म्हणजे संस्कृती आहे."[i]

भाषा, श्रद्धा, परंपरा या प्रत्येक जाती ला स्वतंत्र होता. त्यामुळे रीतिरिवाज व संस्कृती पहावयास मिळते. या सगळ्यांचे तयार झालेले रसायन म्हणजे लोकसंस्कृती आहे. "दोन वंशांमध्ये, दोन संस्कृतीमध्ये निर्माण झालेले जे मिश्रण आहे त्यातून लोकसंस्कृती तयार झालेली आहे.' लोकसंस्कृती' ही संज्ञा ' संस्कृती' हून अधिक भूमिनिष्ठ, निसर्गनिष्ठ आणि जीवननिष्ठ जाणिवांनी व्याप्त असते. भूगोलाचा, निर्सगाचा व परंपरानिष्ठ जाणिवांतून लोकसंस्कृती घडत असते".[ii]

धारबांदोडा तालुका हा निर्सगाने भरलेला असा आहे. पूर्वी 'धारबांदोडा' तालुका हा सांगे तालुक्यचा एक भाग होता. त्यानंतर तो धारबांदोडा तालुका म्हणून अस्तित्वात आला. धारबांदोडा तालुक्यात अनेक जातींचे लोक राहतात. गावातले जे लोक आहेत ते साध्या पद्धतीने आपले जीवन जगतात. लोकांचे जीवन म्हणत असताना त्या लोकांचे राहणीमाण साधे आहे. गावातील लोक खूप प्रेमळ आहेत. बाहेरील दुसरे लोग त्यांच्याकडे आल्यावर त्यांच्याकडे चांगल्या तऱ्हेने वागतात. एकमेकांना मदत करणारे असे धारबांदोडा गावातील लोक आहेत.

### २.३.१ निर्सग, वनस्पती आणि प्राणी

निर्सग हा घटक लोकांशी जुडलेला असा आहे. निर्सग म्हणत असताना त्यात नद्या, झरे इत्यादी येतात. 'धारबांदोडा' तालुका हा निर्सगाने भरलेला आहे. मोठ-मोठी राने आहेत. तिकडे झाडे खूप असल्यामुळे पाऊस जास्त पडतो. रान मोठ असल्याने प्राणी, पक्षी आढळते. 'रानडुक्कर','गवा रेडा' हे प्राणी धारबांदोडा तालुक्यात जास्त आढळतात. धारबांदोडा तालुक्याच्या मोले या गावात 'भगवान महावीर अभ्यारण्य' आहे. तिकडे पुर्वी अनेक प्राणी, पक्षी होते पण आता त्यांची संख्या कमी झाली आहे. आता फक्त तिकडे ' गवारेडा' हा प्राणी जास्त आढळतो.

'धारबांदोडा' तालुक्यात वनस्पती ही मिळतात. गावात जे 'गावटी' वैद्य असतात त्यांना रानात मिळणाऱ्या सर्व वनस्पतीची ओळख असते. 'ताप' आल्यावर अडुकसा (ओडूशाची)पाने पाण्यात शिजवून त्या पाण्यानी आंघोळ केल्यावर ताप कमी होतो. तसे अनेक वनस्पती रानात मिळतात. 'कोडो' हे औषध आहे. तो कोडो करायला ज्या ज्या वनस्पती लागतात ते गावातील वैद्य रानात जावून वनस्पती आणतात, ती वनस्पती उन्हात सुकायला घालतात व सुकल्यानंतर त्या सर्व वनस्पती एकत्र करून शिजविले जातात. तो 'कोडो'(काढा)औषध माणसाच्या आरोग्याला बरा पडतो.

### २.३.२ व्यवसाय आणि उत्पन्न

'शेती' हा धारबांदोडा तालुक्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. नारळ, ऊस, सुपारी, काजू, शेती ही धारबांदोडा तालुक्यातील प्रमुख उत्पन्ने आहे. भात शेतीतून उत्पन्न झालेला तांदुळ दररोजच्या आहारात

वापरतो. तसेच काजू, सुपारी आर्थिक व्यवहरासाठी त्यांची विक्री केली जाते. ऊसची शेती करून मिळालेल्या पिकीला दुसऱ्यांना ते विकले जाते. काजूची पिक केल्यावर काजू पासून मोट्याचा रस काढला जातो. त्याचप्रमाणे मिरि ,मिर्ची यांची पिके घेतात. मिरची तांबडी जाल्यावर ती काडून , चांगल्या प्रकारे सुकुन जाल्यावर बाजारात विकली जाते.

भाजी, फळा यांचे उत्पन्न करून व्यवसाय करायचे. भाजी यात तांबडी, मुळयाची, वांगी, भोपळा, यांची पिकी करतात आर्थिक व्यव्हरासाठी. फळा मध्ये ' चिबड', 'काकडी', 'फणस', 'पपई', 'काळींग'( कलिंगड) यांची सुद्धा विक्री केली जाते.. हा व्यवसाय धारबांदोडा, करमणे, बांडोळी या गावात करताना दिसतो. आर्थिक व्यव्हराच्या गरजेनुसार गावातील लोक हा व्यवसाय करायचे. अशाप्रकारे 'धारबांदोडा' तालुक्यात उत्पन्ने ,व्यवसाय आहे.

### २.३.३ लोकसमजुती

लोकसमजुती म्हणत असताना त्यात गावातील लोकजीवनात प्रचलित असलेल्या रुढी, श्रध्दा, आचार-विचार, लोकभ्रम यात पहायला मिळतो. गावातील लोकामध्ये अनेक समजुती निर्माण झालेल्या असतात.[iii] म्हणजे भुताविषयी, अशुभ- शुभ, द्रुष्ट लागणे, मंत्रतंत्र विषयी( काळा जादू) अशा अनेक समजुती धारबांदोडा तालुक्यात आढळतात. ते पुढील प्रमाणे आहेत.

#### २.३.३.१ भूताविषयी समजुती

लोक म्हणतात भूत हे अस्तित्वात नाहीत. कोणी त्यांना पाहिलेच नाही पण लोकांना भूताबद्दल शंका वाटते. त्यामुळे लोकांच्या मनात भूताची भीती जागृत होते. भूतावर कथा सांगितल्या जातात. गावातील काही लोकांना तर विश्वास आहे कि भूत ही असतात. त्यांच्यावर लोक म्हणतात. .

१) रात्रीच्या बारा वाजल्या नंतर बाहेर जावू नये कारण त्या वेळेत भूतांचा फिरण्याचा वेळ असते.

२) भूत जी असतात ती जास्त झाडावर असतात.

उदा: धारबांदोडा तालुक्यात एक गावात चार रस्ते आहेत. त्या रस्त्यावरून रात्री उशीरा जातात भूत दिसतात. गाडीवरून जाताना ती मधेच येतात. त्यांचे पाय उलटे असतात. एकदा एका माणसाला तिकडून येताना एक महिला रस्तावर उभी राहून लिफ्ट मागत होती. त्या माणसाने त्याला लिफ्ट दिली. गाडीवरून जाताना मध्येच ती महिला गायब होते. तो माणूस घाबरला आणि पडला. तेव्हापासून ३-४ महिने तो आजारी पडला.

गावातील लोक म्हणतात की तिथे खुप लोकांना भूत दिसले आहेत. जर कुणला ते भूत दिसल की त्यांनी आपली गाडी थांबवून दयायची नाही जो थांबला तो गेला असे लोक म्हणतात.

### २.३.३.२ दृष्टीबाधा विषयी समजुती

द्रुष्टी विषयी लोकजीवनात बऱ्याच समजुती आहेत. लहान मुलांच्या संदर्भात खुप गैरसमज आहेत. जर लहान मुलांना द्रृष्ट लागली तर ते मोठ्याने रडतात, त्यांना ताप येतो. यावेळी त्यांची मग दृष्ट काढली जाते. लोकांचे काही उपाय:

१ काळा धागा पा्याला व हाताला बांधला तर दृष्ट लागत नाही.

२ लहान मुलांना गालाला काजळ लावले तर त्यांना दृष्ट लागत नाही.

३ जर कुणाची तरी द्रष्ट लागल्यास केसांनी, पाच मिरच्यानी, मिठाने अंगावरून पाच वेळा ओवाळून चुलीत टाकल्याने दृष्ट निघते.

४ जेवताना कोणी टक लावून पाहिल्यावर दृष्ट लागते. जेवण ताळयाला लागते.

### २.३.३.३ आचार, श्रद्धा विषयी समजुती

गावात लोक ज्या समाजात राहते त्या समाजात अनेक आचार-विचार, श्रध्दा असतात. त्यात काही समजूती खालीलप्रमाणे

१) उचकी आल्यावर नातेवाईकांनी आमची आठवण केली असे समजावे.

२) निजलेल्या माणसाला कधीच ओलांडू नये.

३) उंबरट्यात शिंकू नये. शिंकले तर डोक्यावर पाणी घातले जाते.

४) पालथे झोपू नये.

### २.३.३.४ अशुभ विषयी समजुती

१) सकाळी बाहेर जाताना मांजर आडवी घेल्यावर अशुभ मानले जातात

२) स्त्रीचा डावा डोळा लावणे म्हणजे स्त्रीयांना शुभ मानले जातात.

३) पिंपळीच्या झाडाची पूजा केल्यावर संकटे येत नाहीत.

### २.३.३.५ काही इतर समजुती

१) रात्रीच्या वेळी बोटाची नखे काडू नये.

२) घरातील कोणी ही व्यक्ती घरातून बाहेर जाताना झाडू मारू नये.

३) घरात रात्रीच्या वेळी किंचाळी मारू नये.

४) सकाळी कावळा घरी येऊन काव काव करून ओरडत असल्यास पाहुणा येणार असे समजावे.

५) शनिवारी नखे कापू नये.

६) बुधवारी आणि रविवारी तुळशीची पाने काडू नये.

## २.४ धारबांदोडा तालुक्यातील सण उत्सव

'धारबांदोडा' तालुक्यात गावोगावी अनेक प्रकारचे सण- उत्सव साजरा करतात. गावोगावी असलेल्या मंदिरात देवांचा वर्धापन दिवस, मंदिरात होणारी जत्रा, 'कालोत्सव' तेथील लोक मोठ्या उत्सवाने

साजरा करतात. तसेच आणखी होणारे सण-उत्सव ही साजरा करतात. धारबांदोडा तालुक्यातील अनेक गावात होणारे सण पुढीलप्रमाणे आहेत.

### २.४.१ महाशिवरात्री

'धारबांदोडा' तालुक्यातील 'तांबडी सुर्ला' येथील महादेव मंदिरात महाशिवरात्रीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. शिवरात्रीच्या दिवशी मंदिरात लोकांची खुप गर्दी पहायला मिळते. गावतील तसेच गावाबाहेरील लोक मंदिरात दर्शन करायला येतात. येणाऱ्या सर्व लोकांसाठी प्रसाद दिला जातो. तसेच दुपारच्या वेळी महाप्रसाद ही वाटला जातो.

धारबांदोडा तालुक्यातील आणखी एका गावात 'महाशिवरात्री' साजरी केली जाते. ते म्हणजे कुळे आणि शिगाव या गावात महादेवाचे मंदिर आहेत. या देवळात महादेवांची मूर्ती आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी लोक अभिषेक घालण्यासाठी मंदिरात येतात. 'कुळे' येथील 'राकेशमळी' या देवळात शिवरात्रीच्या दिवशी रात्री नाटक असते.

### २.४.२ दिवाळी

'धारबांदोडा' तालुक्यात दिवाळी हा सण उत्सहाने साजरा केला जातो. गोव्यात दिपावलीला 'दिवाळी' असे म्हणतात. धारबांदोडा तालुक्यात दोन टप्यातून दिवाळी साजरी केली जाते. 'दिवाळी' या उत्सवाचा विचार नरकचतुर्दशी पासून केला जातो कारण दिवाळीच्या आदल्या दिवशी नरकचतुदर्शी दिवशी रात्री नरकासुराचे दहन केले जाते. नरकासुराचे दहन करून दुसऱ्या दिवशी ती 'दिवाळी' साजरी करतात त्या दिवाळीला धारबांदोडा तालुक्यातील लोक 'धाकली दिवाळी' असे म्हणतात. धाकली दिवाळी म्हणजे 'धाकटी'. नंतर 'तुलसी विवाह' साजरा केला जातो. त्याला 'तुळशी लग्न' असेही म्हटले जाते . त्या दिवळीला मोठी दिवाळी असे म्हणतात. धाकटी दिवाळीच्या दिवशी सकाळी अंगाला तेल लावून आंघोळ करतात. नंतर अंगणात कारीटे ठेवली जातात. ती कारीटे फक्त घरातील पुरुष मंडळी फोडतात. ते फोडून थोड जिभेने चाखल जात. मग त्यांची आरती करून त्यांनी घरात यावे. धाकटी दिवाळीच्या दिवशी पोहे म्हणजे 'फॉव' यांचा पदार्थ केला जातो. दुध पोहे, बटाट पोहे, सुके पोहे, आणि त्याच्याबरोबर आंबाड्याची चटणी सुद्धा केली जाते.

'व्हडली दिवाळी' म्हणजे 'तुळशीच लग्न' ही दिवाळी साजरी केली जाते. तिला व्हडली दिवाळी किंवा मोठी दिवाळी असेही म्हणतात. या दिवाळीच्या दिवशी तुळस धुवून घेतली जाते. तुळशीची पूजा करून तिची नारळाने ओटी भरली जाते. तुळशीवर नाकट घातली जाते. दुपारच्या वेळी खीर आणि 'तांदळाचे वडे' करून तुळशीला नैवेद्य दाखवला जातो. संध्याकाळी तुळशीला केळीच्या ' गोब्यांनी'( केळीचा गाभा) सजविली जाते. फुलांचा हार, आंब्यांच्या पानांचा हार घातला जातो. रात्री तुळशीची पुजा केली जाते, 'अक्षरपाट' केला जातो. पुजा जो करतो तो घरच्या स्त्रीयांना ' जोडवी' पेटवून देतो. जोडी पेटवून तुळशीचे पाच फेरे घेवून स्त्रीया तुळशीच्या पुढे बसून जोडी पेटवतात. गावातील लोक एकामेकांच्या घरी जातात. चुरमुली खाण्यासाठी.

### २.४.३ गणेश चतुर्थी

गणेश चतुर्थी हा सर्वांचा आवडणारा असा सण आहे. गावातील लोक गणेश चतुर्थी याला ' चवत' असे म्हणतात. 'चवतीच्या' आदल्याच दिवशी गणपतीची मुर्ती जिथे ठेवली जाते त्या जागेवर सजावट केली जाते. पताके लावले जातात. धारबांदोडा तालुक्यात काही गावात ' तिसल' करतात. 'तिसल' म्हणजे एका वर्षी गणपती दीड दिवस  आणि दुसऱ्या वर्षी पाच दिवस गणपती ठेवला जातो. तर काही गावात वार्षिक पाच दिवस ठेवला जातो. 'गणेश चतुर्थी' च्या पहिल्या दिवशी गणपतीची मुर्ती आणली जाते. पुजा करून त्या मुर्तीला त्यांच्या जागेवर विराजमान करतात. पूजा जाल्यावर गणपतीला नेवेद दाखविला जातो. दुपारी गावातील मुले आरती करायला येतात. दुपारी आरती झाल्यावर गणपतीला पान दाखवून घरातील सगळी माणसे जेवून घेतात. संध्याकाळी मग पुन्हा गणपताची पुजा करतात. गावातील लोक रात्री आरती करण्यासाठी येतात. आरती जाल्यानंतर माटोळी जी बांदलेली असते ती तोडली जाते. माटोळीला बांधलेली फळे काढून आपल्या घरी घेवून जायचे. गावातील सर्वांच्या घरी आरती जाल्यावर गवर पावून गणपतीची मूर्ती बाहेर काढली जाते विर्सजनासाठी. गणपतीची मूर्ती चालत घेवून नदीवर नेली जाते. तिथे आरती करतात. घराणे घातले जाते. नंतर गणपतीची मूर्ती उभारून नदीच्या पाण्यात ठेवून विर्सजन केले जाते.

### २.४.४ वडा पुनव

'वडा पुनव' म्हणजे वटपोर्णिमा. या दिवशी गावातील विवाहित स्त्रीया वट वृक्षाची पूजा करतात. या दिवशी असे म्हटले जाते की स्त्रीयांनी वटाची पूजा केल्यावर त्यांच्या नवऱ्यांचे आयुष्याल वाडते. गावात तर वडाचे झाड असतातच. स्त्रीया वडाच्या झाडाची पूजा करण्यासाठी जातात. वडाला कुंकू, गंध लावून , फुल घालून पुजा करतात. पुजा जाल्यावर 'तांबडा धागा' घेवून तो वडाच्या भोवती बांधला जातो. बांदताना वाडाच्या झाडाचे सात फेरे घेवून तो धागा बांधला जातो. गावातील जी म्हातारी माणसे आहेत ती सांगतात कि वडा भोवती सात फेरे घेवून धागा बांदल्यावर त्या स्त्रीच आणि तिच्या नवऱ्याचा आयुष्य एकमेका बरोबर सात जन्म राहत असे म्हणतात. वडाची पुजा करून झाल्यावर तिथे द्रोण( दोणे) देतात. त्या दोण्यात फळे असतात. 'अननस', 'आंबा', 'फणस', 'वाटाणे' इत्यादी असतात.

### २.४.५ नागपंचमी

धारबांदोडा तालुक्यात 'नागपंचमी'हा सण साजरा केला जातो. हा सण पंचमीच्या दिवशी गावातील अनेकांच्या घरी साजरा केला जातो. पंचमीच्या दिवशी गावातील लोक 'नागाची' पुजा करतात. मातीपासून तयार केलेली नागाची मुर्ती घरात आणली जाते. त्या नागाच्या मुर्तीला एका जागेवर ठेवली जाते. त्या मुर्तीची पूजा करतात. नागावर दुध घालून पूजा केली जाते. त्यानंतर गंध, फुल घातले जातात. पुजा करून झाल्यावर प्रसाद ठेवला जातो. दुपारी जेवणाच्या वेळी गावातील सर्व लोकांना पंचमीच्या दिवशी जेवणाला बोलावात. संध्याकाळी पुन्हा पुजा करून नागाला पाण्यात विर्सजन केले जाते.

### २.५ समारोप

धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृती आणि लोकजीवन या प्रकरणाची मांडणी करताना अनेक गोष्टी उघडीस आल्या. या प्रकरणात धारबांदोडा तालुक्यातील लोकांचे जीवन कसे माहे याचे विवेचन केलेले आहे. तसेच त्यांची जीवनशैली विषयी लिहिलेले आहे. गोव्यातील धारबांदोडा तालुका सामाजिक, सांस्कृतिक अंगाने कसा आहे याचे समालोचन केलेले आहे. धारबांदोडा तालुक्यात अनेक जाती- जमातींचे लोक राहतात. त्या कोणत्या कोणत्या जाती आहे त्या सगळ्या सदर प्रकरणात आलेले आहेत. तसेच या तालुक्यात

मिळणाऱ्या वनस्पती , जंगलात आढळणारे प्राणी यांच्या विषयी इथे आलेले आाहे. धारबांदोडा तालुक्यातील लोकां मध्ये अनेक समजुती असलेल्या पहायला मिळते त्याचे विवेचन इथे केलेले आहे. गावात होणाऱ्या सण-उत्सव कशा प्रकारे साजरा करतात कसे इतरापेक्षा वेगळे आहे ते आलेले आहे.

**२.६ निष्कर्ष**

१.धारबांदोडा तालुका हा संस्कृतीने भरलेला असा दिसून येतो.

२. धारबांदोडा तालुक्याची सांस्कृतिक, सामाजिक अंगाने ओळख होते.

३. धारबांदोडा तालुक्यात साजरी होणाऱ्या सण-उत्सवातून तेथील लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

४. धारबांदोडा तालुक्यात कुळमी या  जातीत उप जाती पहायला मिळतात.

५. धारबांदोडा तालुक्यातील लोकसंस्कृतीचे व जीवनाचे दर्शन घडते.

**संदर्भ सूची**

---

[i] भोसले डॉ द. ता ,लोकसंस्कृती: स्वरूप आणि , पद्मगंधा प्रकाशन, पांडुरंग कॉलनी, प्रथमावृत्ती २७ मे २००४, पृ. क्र ५

[ii] भोसले डॉ द. ता ,लोकसंस्कृती: स्वरूप आणि , पद्मगंधा प्रकाशन, पांडुरंग कॉलनी, प्रथमावृत्ती २७ मे २००४, पृ. क्र ७

[iii] कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, पहिली आवृत्ती १० जानेवारी २००७, पृ. क्र २९४

# प्रकरण ३

# धारबांदोडा तालुक्यातील लोकवाङ्मय आणि लोककथा

**प्रास्ताविक** ........ **39**

**३.१ धारबांदोडा तालुक्यातील लोकगीते** ........ **39**

३.१.१ फुगडी गीते ........ **40**

३.१.२ धालो गीते ........ **43**

३.१.३ शिगमोत्सवातील नृत्य ........ **44**

**३.२ धारबांदोडा तालुक्यातील लोककथा** ........ **47**

३.२.१ लोककथा ........ **47**

३.२.१.१ कवडेबाल शिगाव ........ **48**

३.२.१.२ दुधसागर समज ........ **49**

३.२.१.३ केळ्या- मेळ्या ........ **51**

३.२.१.४ सातेरी देवाळाकडच्या उदकाची काणी ........ **51**

३.२.१.५ प्राण्याची पार्टी ........ **52**

३.२.१.६ म्हातारा सिंह ........ **54**

३.२.१.७ बायको आणि कुत्री ........ **56**

३.२.१.८ हुशार कोल्हो ........ **58**

३.२.१.९ हावरो ससो ........ **58**

३.२.१.१० सात सुना ........ **60**

३.२.१.११ म्हातारी आनिक कोमो ........ **61**

३.२.१.१२ रगताचे तळे ........ **62**

३.२.१.१३ म्हातारी आणि तिजो पोर ........ **64**

३.२.१.१४ म्हाताराची काणी ........ **65**

३.२.१.१९  शाणु चोर ........................................................................................................ 70
३.२.१.२० बिरबलाची काणी.............................................................................................. 72
**३.३ धारबांदोडा तालुक्यातील म्हणी ........................................................................................ 73**
३.३.१ म्हणी ........................................................................................................................ 73
**३.४ समारोप ........................................................................................................................ 74**
**३.५ निष्कर्ष........................................................................................................................ 74**

**प्रकरण ३**

# धारबांदोडा तालुक्यातील लोकवाङमय आणि लोककथा

## प्रास्ताविक

धारबांदोडा तालुक्यातील लोकांची अभिव्यक्ती म्हणजे तेथील लोकसाहित्य आहे. लोकसाहित्यातील एक महत्वपूर्ण विभाग म्हणजे लोकवाङमय होय. लोकवाङमयातून लोकांच्या जीवनाचे, समाजाचे व संस्कृतीचे आविष्कार झालेले असते. कोणी एका काळी एखाद्या मानवाने ते जन्माला घातलेले असून ती व्यक्ती निर्मिती न राहता समूहाची निर्मिती होते.

या प्रकरणाव्दारे धारबांदोडा तालुक्यातील लोकवाङमय आणि लोककथा यांचे विवेचन करायचे आहे. धारबांदोडा तालुक्यातील लोकगीते व त्यांचे प्रकार, धारबांदोडा तालुक्यातील लोककथा, म्हणी व वाक्प्रचार या सर्वांचे विवेचन करायचे आहे.

## ३.१ धारबांदोडा तालुक्यातील लोकगीते

“ भारतात लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. समाज अस्तित्वात येऊन त्याचे सामूहिक जीवन सुरू झाले तेव्हापासूनच लोकगीतांची परंपरा अव्याहतपणे सुरू असली पाहिजे. जेव्हापासून लिखित वाङमय उपलब्ध आहे तेव्हापासूनच्या सगळ्याच वाड्मयात लोकगीतांचे उल्लेख सापडतात. त्यावरून त्या काळी लोकगीते समाजात प्रचलित होती असे दिसते.”[i] धारबांदोडा तालुक्यात अनेक लोकगीते आढळतात. या लोकगीताअंर्तगत फुगडी गीते, धालो गीते, शिगमोत्वातील गीते असे प्रकार आढळतात. लोकगीतांमधून स्त्रीयांचे जीवन, जीवन जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, दुःख, सुख यांचे चित्रण करणारे असते. लोकगीतांचा आविष्कार लोकोत्सवातून होते. धालोच्या मांडावरून उत्साह, आनंद या भावनांचे चित्रण घडते.

### ३.१.१ फुगडी गीते

फुगडी हा गोव्यातील स्त्रियांचा लोकनृत्य प्रकार होय. कोणत्याही सण- उत्सवाच्या प्रसंगी या प्रकारचे नृत्य सादर होते. धारबांदोडा तालुक्यातील स्त्रीया गणेश चतुर्थी, सरस्वती पुजन अशा प्रसंगी फुगडी नृत्याचे सादरीकरण करतात. त्याचबरोबर गावाच्या मांडावर धालो सादरीकरण करताना फुगडीचे नृत्य सादर केले जाते. त्या फुगडी गीतांतून स्त्रिया आपल्या भावना, विचार, वेदना व्यक्त करतात. फुगडीचे अनेक प्रकार आहेत. धारबांदोडा तालुक्यात फुगडीचे अनेक प्रकार पहायला मिळतात. ते म्हणजे उभी फुगडी, आडवी फुगडी, दोन रांगेची फुगडी इत्यादी.

फुगडी हा प्रकार सादर करण्याच्या सुरुवातील गणपतीच्या नावावर असलेली फुगडी सुरुवातीच म्हटली जाते. अनेक ठिकाणी फुगडीची सुरुवात पुढील फुगडी गीताने होताना दिसते.

१.

**गणपती देवा करीन तुझी सेवा,**
**नवस करीन मी**
**देवा नवस करीन मी**
**पाच फळांनी, पाच फुलांनी**
**दुर्वा वाहीन मी, देवा दुर्वा वाहीन मी**
**कपळाचा कुंकू दे जन्मभर, आणि काय मागीन मी**
**देवा आणि काय मागीन मी**
**हाताची काकणा दे जन्मभर आणि काय मागीन मी**
**देवा आणि काय मागीन मी**
**गळ्यातला मणी दे जन्मभर आणि काय मागीन मी**
**देवा आणि काय मागीन मी**

या फुगडी गीतांतून स्त्री गणपती समोर आपल्या अखंड सौभाग्याची याचना करताना दिसते. स्त्रीचा सौभाग्य हाच तिचा मोठा अलंकार असतो. समाजात सौभाग्याचे प्रतिक मानणाऱ्या कपाळावरील कुंकू, हातातील काकणं आणि गळ्यातला मणी या गोष्टी राखून ठेवण्या संबंधीत ती गणपती समोर याचना करताना

दिसते. या गीतामध्ये गणपतीची आराधना, भक्ती असल्यामुळे गोव्यात अनेक ठिकाणी फुगडीची सुरुवात या गीतातूनच केली जाते.

२.

**दारातल्या तुळशीगे पानन पान**
**फुलशो गे पानन पान फुलशी**
**कपळाच्या कुंकासाठी किती लोक वनवासी**
**किती लोक वनवासी**

या फुगडी गीतातून स्त्रीला तुळस दररोज पानन पान फुललेली पाहायची असते. तुळस ही दररोजची स्त्रीची अंगणातली सोबतीण असते. पानन पान फुललेली तुळस ही स्त्रीच्या सौभाग्याचे प्रतिक आहे.

**३.**

**माझी नेण्टेली बाई सीता**
**माझी नेण्टेली बाई सीता**
**सीता गेली गे नयेच्या वळार**
**सीता गेली गे नयेच्या वळार**
**सीतेक मिळाला धनुष्य बाण**
**सीतेक मिळाला धनुष्य बाण**
**सीतेन बाप्पाक साद केला**
**सीतेन बाप्पाक साद केला**
**साद वाऱ्याच्या वेगाने गेला**
**साद वाऱ्याच्या वेगाने गेला**
**बाप्पा धुटधुटी धावूनी आला**
**बाप्पा धुटधुटी धावूनी आला**
**दुवे कसले संकट आले**
**दुवे कसले संकट आले**
**बाप्पा केला गे नमस्कार**
**बाप्पा केले गे नमस्कार**
**माझी नेण्टेली बाई सीता**
**माझी नेण्टेली बाई सीता**

वरील फुगडी गीत हे संस्कार गीत होय. घरात वाढणारी छोटीसी सीता म्हणजे 'नेण्टेली' सीता असते. या गीतातून निर्सग व्यक्त झालेला आढळतो. नेण्टेली सीता म्हणजे छोटीशी सीता जी नदीवर जाते. नदीवर तीला धनुष्य बाण मिळताच ती आपल्या वडिलांना साद घालते. तो साद वडिलांच्या कानी पडताच ते पळत पळत सीते पाशी येते. मग सीता मिळालेला धनुष्य बाण वडिलांना दाखवते. ते सीतेला धनुष्याला नमस्कार कर म्हणून सांगतोय. या फुगडीतून लोकांच्या श्रद्धा तसेच जीवनाचे दर्शन आलेले आहे.

**४.**

**शेत माझी डोंगरी ग**
**चित माझी माहेरी**
**आई माझी चिंता करी**
**दुव माझी एकटी**
**नाही आई एकटी मी**
**सासू आहे सोबती**

या फुगडी गीतातून आईला आपल्या मुलीची काळजी आहे असे दिसते. मुलगी लग्न करून सासरी आली पण तिच मन मात्र माहेरीच आहे. मुलीला माहिती आहे कि आपल्या आईला आपली काळजी वाटत असेल. मुलगी आपल्या आईल सांगू इच्छिते की आई तुम्ही माझी काळजी करू नका. मी एकटी नाही आहे. माझ्या सोबतीला माझी सासू आहे.

अशा प्रकारच्या उत्साहात, मनोरंजनपर अनेक फुगड्या येथील समाजात आढळतात. फुगड्यांच्या शेवटी झेमाडो नावाचा फुगडी प्रकार घातला जातो. ती फुगडी म्हणजे

**५.**

**झेम झेम झेमाडो**
**आमच्या पोरसान आमाडो**
**आमाड्याची पान पिकली गे**
**आमाडो झालो बडको गे**
**शेजरी बाई राझू**
**हाव राझू दिना गे**

धारबांदोडा तालुक्यातील फुगडी गीते ही तेथील सगळ्या स्त्रीयांचे चित्रण करणारी आहे. फुगडीत स्त्रीयांचीच रचना केलेली आहे.

## ३.१.२ धालो गीते

धालो हा गोमंतकातील स्त्रियांचा महत्वपूर्ण उत्सव आहे. पौष महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी गोमंतकात धालो उत्सव होतो. धारबांदोडा तालुक्यात उत्सव पौष महिन्यात होतो. धारबांदोडा तालुक्यातील काही गावांमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. सर्व स्त्रिया धालांच्या मांडांवर धालो खेळटाना दिसतात. धालोच्या मांडा वर अनेक गीतांचे सादरीकरण करतात. यात अनेक प्रकारच्या फुगड्या आणि गीतांचा समावेश असतो.

धालोच्या मांडांवरील सादरीकरण होत असताना त्यात अनेक प्रकारच्या फुगड्या आणि गीतांचा समावेश असतो. धालोच्या मांडावर तुळशी वृंदावना समोरील पेटलेल्या धालेच्या अनेक गीतांना रंग भरतो. फुगडीचे विविध प्रकार मांडावर सादर केले जाते. धालो उत्सवाच्या शेवटच्या रात्री नुत्याबरोबर नाटय ही सादर करतात. विविध प्रकारांची तसेच अनेकांची सोंगे करतात. धारबांदोडा तालुक्यातील धालो मांडावरही आसाच धालो साजरा केला जातो.

धालोच्या मांडावरील गावकर हा देवाला नारळ, विडा- सुपारी, तांदळाची पड काढतो. तुळशी समोर एका पाठावर समई लावली जाते. बाजूला गुळ, विडा , चुडा, केळी आणि फुले ठेवली जातात. विधी करून व देवांचे आवाहन करून वार्षिक धालोत्सवाला सुरुवात होते.

**१.**
**पयले नमन करू आमी गणेश देवाक गे**
**गणेश देवाक गे**
**दुसरे नमन करू आमी माणाक देवाक गे**
**माणाक देवाक गे**
**तिसरे नमन तुळशी माते**
**तिसरे नमन तुळशी माते**

या गीताने गणेश देवांना , माणाच्या देवाक आणि तुळशीच्या मातेक नमन करून धालो उत्सवाची सुरुवात केलेली आहे.

**२.**

**श्री धालो गे आम्ही धालांनी खेळूया गे**
**आम्ही धालांनी खेळूया**
**आयली जाल्यार बरी जाली**
**सखिया साद घाला गे**
**शोवका बाये शोवका गे**
**तांबडे माडा शोवका गे**
**तांबडे माडा शोवका**
**तांका सुवारी सीता**
**तांका सुवारीता**
**आणि गेल्यो मणी गेल्यो**
**सखिया धालो घाला गे**
**सखिया धालो घाला गे**

धालो हा गोव्यात सगळीकडे आढळणारा उत्सव आहे. यातून सादर होणारी गीते समान असतात. वरील धालो गीत गोव्यातील काहींच गावातील धालो उत्सवातून सादर होते. असे असेले तरी त्या ठिकाणी स्थानिक जीवनाचे आणि संस्कृतिचे दर्शन धालोगीतातून दिसून येते.

### ३.१.३ शिगमोत्सवातील नृत्य

गोव्यात शिगमा हा लोकांचा आवडीचा उत्सव आहे. फाल्गुन महिन्यात हा उत्सव साजरा केला जातो. शिगमा हा  पुरुषांचा उत्सव असतो. त्यात स्त्रियांचा सहभाग नसतो. या उत्सवात विविध तऱ्हेच्या विधी, दैवते, लोकगीतांचे प्रकार , परंपरा यांनी नटलेला हा लोकउत्सव आहे. शिगम्याच्या सुरुवातीच्या दिवशी ‘मांडावर’ नमनच्या वेळी गावकर देवापुढे नारळ ठेवतो व साकडे घातले जाते. तसेच समई पेटवली जाते. त्यानंतर मांडावर शिगमा खेळला जातो. ढोल, ताशा, घुमटे , कासाळे ही वाद्ये घेवून शिगमा खेळला जातो. मांडावर खेळून जाल्यावर गावातील घरोघरी नाचण्यासाठी ‘ मेळ’ निघतात.’ मेळ’ म्हणजे गट.

शिगमोत्सवात पुरुषांचे मेळ असतात. घरोघरी मेळ जातात आणि परंपरेने चालत आलेले नृत्यप्रकार पुरुष सादर करतात.

शिगमा खेळताना त्या लोकांना तळी दिली जाते. तळी म्हणजे घराच्या दारात पाटावर ताटात तांदूळ, गुड, नारळ, पैसे ठेवले जातात. हे मेळ ताटातले पैसे व नारळ घेवून जातात. वेगळ्या समाजात वेगवेगळया पद्धतीने शिगमा उत्सव साजरा केला जातो.[ii]

**१.**
**सजिन कोले मजिन कोले**
**सजिन केले मजिन कोले**
**मजिन कोले**

**२.**
**अश्यो इल्लो इल्लो मारुल्यो केळीपानाच्यो**
**बेताळा क माळो भांगराच्यो**
**अशा वयला वयला डोंगरा सुर्य उदेला**
**सुर्याच्या सावलेक वाघ गोटेला**
**वाघाचे चामडे काढून**
**ढोलाक दसेला**
**ढोलाच्या तालार शिगमो नाचयता**
**हे नाच रे नाच गड्या खेळगड्या**
**शिगम्याच्या माणाच्या म्हालगड्या**
**हर हर हर हर महादेव**
**हर हर हर हर महादेव**

**३.**
**रामा लक्ष्मणा सीता तीगा जाणा**
**रामा लक्ष्मणा सीता तीगा जाणा**
**तिगा चाललीबा नीरंजना वर**
**तिगा चाललीबा नीरंजना वर**
**वनान जावून तेनी गुम्पा शीबा नेल्या**
**वनान जावून तेनी गुम्पा शीबा नेल्या**
**गुम्पे ठेविलीबा सीता सुंदरीरेशी**

**गुम्पे ठेविलीबा सीता सुंदरीरेशी**
**तिजे घर दार नणा ससो वस**
**तिजे घर दार नणा ससो वस**
**मोर नाचता म्हणो कुमा तंडाताली**
**मोर नाचता म्हणे कुमा तंडाताली**
**कुमा तडीचे पकट्टे मडयाले**
**कुमा तडीचे पकट्टे मडयाले**

वरील शिगमा गिते गावात म्हटली जाते. वरील तिसरे जे गीत आहे ते रामायण कथेवर आहे.जेव्हा राम, लक्ष्मण आणि सीता वनवासला जातात त्या वनवासाचे चित्रण या गितातून केले आहे.

शिगम्याच्याच दिवसात धारबांदोडा तालुक्यातील शिगाव या गावात दुरीग उत्सव केला जातो. दुरीग हा एक अनोखा लोकोत्सव आहे जो शिगाव, कुळे येथे रंगाई, शांतादुर्गा मंदिरात होतो.

या उत्सवाचा मुख्य विधी म्हणजे सावरीचे झाड कापले जाते. ते झाड सुमारे ४० फूट उंच असते. झाड कापल्यावर ते साफ सुळसुळीत करून गावातील सर्व लोक ते झाड रत्यावरून ओढून आणतात. ते आणून मंदिराकडे ठेवले जाते. मग रात्री गावातील सर्व लोक दुरिग उभे करण्यासाठी एकत्रीत येतात. एका बाजूला राझू  बांदला जातो व दोन्ही बाजूने लोक राझू ओढतात व  काही वेळानंतर दुरिग उभे करतात . देवळातील गावकर जो असतो तो तिथे पूजा करतो. नारळ फोडला जातो. गावकरानी नारळ फोडल्यावर सर्व लोक तिकडे नारळ फोडतात. नंतर गावकर त्या दुरिगवर चढतो व वर बसतो. दोरीला पाण्यांनी भरलेली कळशी बांधून त्याला दिली जाते. मग गडे येतात. गडे म्हणजे जे दुरीग वर चडणारे. गडे येतात आणि दुरीग वर चढतात. ते वर चढतात तेव्हा  वर जो गावकर बसलेला असतो तो वरून पाणि टाकतो. पाणी अंगाला लागल्यावर ते घसरून खाली पडतात. गडे परत परत वर चढतात आणि खाली पडतात. हे पहायला खुप मजाच वाटते. मग तसे करून खूप वेळाने गडयातील एक जण वर चढतो. गावकर त्याला अबोली फुलांचा हार आणि नारळ देतो. मग तो खाली उतरतो. सर्व गडे मग आंघोळ करायला नदीवर जातात. अशा प्रकारे दुरिगेत्सव साजरा केला जातो.

पूजा केल्यानंतर अबोली फुलांचा हार, आंब्याची पाने आणि नारळ दुरिगच्या वरच्या बाजूला बांधला जातो आणि वरच्या बाजूला एक दोरी ठेवली जाते. गावकर जो असतो तो दोरीच्या सहारयाने वर चढतो आणि तेथून पाण्याने भरलेली कळशी वर काढतो. हे पाणी तो दुरिगावर ओततो. दुरिग मग निसरडे होते त्यामुळे कोणालाही त्यावर सहज चढणे कठीण होते. संगीत सुरू होते आणि गडे वर चढू लागतात.

## ३.२ धारबांदोडा तालुक्यातील लोककथा

‘भारतीय लोक वाङमयातील लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. भारत हा कथाप्रिय देश म्हणून नवाजलेला आहे. फार प्राचीन काळापासून भारतीयांची कथा वाङ्ङयाकडे पाहण्याची दृष्टी भाविकाची आहे.’ लोककथा मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. लोककथा समाज जीवनाशी एकरूप असतात. लोककथातून इतिहासाचा शोध आपण घेऊ शकतो.

लोककथांचे अनेक प्रकार आहे. दैवत कथा, दंतकथा, बोध कथा, अद्भूतरम्य कथा, उत्पत्ती कथा, प्राणी कथा, हास्य कथा, अनुभव कथा, वास्तव कथा इत्यादी. जिथे माणूस असतो तिथे लोककथा असतातच. धारबांदोडा तालुक्यात ही अशाच लोककथा सांगितल्या जातात.

### ३.२.१ लोककथा

“ लोककथांचा समाजमनावरील हा प्रभाव काळापासून चालत आला आहे. भारतीय लोकवाङमयातील परंपरा फार प्राचीन आहे. भारत का कथाप्रिय देश म्हणून नावाजलेला आहे. फार प्राचीन काळापासून भारतीयांची कथावाङमयाकडे पाहण्याची दृष्टी भाविकांची आहे.”[iii]लोककथा या मौषिक परंपरेने पिढ्यानपिढ्या चालत आलेली आहे. धारबांदोडा तालुक्यात अनेक प्रकारच्या कथा आढळतात.

### ३.२.१.१ कवडेबाल शिगाव

**कवडेबाल शिगाव**

शिगाव या गावाक कवडेबाला ची कोणी मूर्ती आणली केंना आणली याची खबर कोणाकुय खबर ना. पैली ती मूर्ती एका झाडाच्या सकल आसली . मागीर थय च्या गावाच्या लोकांनी वर्गणी काढली आनि थय लहानशी घुमटी बानली. खयचोय सण आसूनी गुडी पाडवा, नागपंचमी , गावकर वाडी मनून भरता . थय जर मागणे बीन आसले जाल्यार उजवाते पुडो , पिनर , धूप ,तेल ,साखर ,नाल आनि मातयेचो घोडो वरपाचो आसता. तेका घोडो घालपा अशे मणतात. देवाच्या कडेन एक बारिकशी चांदीची घोडया चो पुतळो आसता तेज्या कुशीनूच तेका घोडो घालपा अशे मणतात.

देवाच्या कडेन एक बारिकशी चांदीची घोडया चो पुतळो आसता तेज्या कुशीनूच मातेचो घोडो दवरपाचे आसता. मागीर ते घोडे मातेसून केल्ले आसून ते मोडोन पडतात. कवडेबालाला जो आसा तेका ‘ राखण्याचो देव ‘ अशे देखील मणतात याचे कारण अशे आसा कि पैलीच्या काळाक राखणो गोरवाक घेवोन रानाक वयतालो. तेन्हाच थयच्या लोकांनी तेका पोळोन ताका देव अशे मानून घेवपाक चालू केले.कवडेबाल या देवाची पूजा गावचो जो गावकर आसता तो करत आसता. आनि पूजा करून थय गावकर जे किदे निवेद दवरता ते आनि कोणी खावपाक जायना. जेन्हा लोक रानान आपल्या गोरवांक घेवून चारोपाक वयता तशेच लाकुड हाडपाक वयता तेन्ना त्या देवाक पाया पडोन वयता. हो देव जो आसा तो शंभरे वर्सा पयलीचो आसपाक शकता. पयली तो उघड्या झाडा मळार आसलो तेजे रूपांतर मागीर देवळात जावून तीस वर्सा जाती आसतली. कवडेबाल हो देव ज्या जाग्यार आसा तय च्या गावाच्या लोकांक ‘ कवडेबा’ अशे मणले जाता. तशे तेजेनाव कवडेवाल अशे पडले. हो देव कुळे आनि शिगावच्या शिमेच्या पयस आसा आनि तो घोड्यार बसलेलो आसा. त्या देवाचे देवूळ बांन्दले दिसा सात बटाक हाडून पूजा केलेली. ह्या देवाक खयच्या जनावरांची बळी दिवपाकूच जाय अशे ना. पून मागणे बीन आसल्यारूच दिताक.

"शिंगाव येथील कवडेबाल यांची मूर्ती कुणी आणली, केव्हा आपली ह्याची खबर कुणालाही माहीत नाही. पण पूर्वी ती झाडांच्या खाली होती. त्यानंतर गावच्या लोकांनी वर्गणी काढून तिथ लहानशी घुमटी बांधली. कुठल्याही सणाला (गुढी पाडवा, नागपंचमी) गावकार वाडी भरतात. तिकडे मागणे वा अंगवण असेल तर अगरबत्ती, पिंजर, धूप, तेल, साखर, नारळ आणि मातीचा घोडा द्यायचा असतो. ज्याला "घोडो घालप" असे म्हणतात. देवाच्या शेजारी लहानशी चांदीची, घोड्याची मूर्ती आहे. त्याच्या कुशीला मातेचा घोडा ठेवायचा असतो .मग ते घोडे मातीपासून तयार केले गेले असल्यामुळे ते नष्ट होतात. कवडेपालाला "राखण्यांचा देव" असे म्हणतात. ह्याचे कारण म्हणजे पूर्वी काळात राखणे गुरांना घेऊन रानात जात होते. तेव्हा त्या लोकांनी देवाला पाहून त्याला मानायला सुरवात केली.

ह्या देवाची पूजा गांवकार करतो आणि तिकडे गांवकार जे ठेवतो ते दुसऱ्याने खाऊ नये. जेव्हा लोक गुरांना घेऊन जातात किंवा लाकडे आणायला जातात तेव्हा त्याला नमस्कार करून जातात. हा देव शंभरवर्षापूर्वीचा असायला पाहिजे. पूर्वी तो उघड्यावरच झाडांमूळांत होता. त्याचे रूपांतर देऊळात होऊन तीस वर्षे झाली असणार, कवडेबाल ज्या जागेवर आहे तिकडच्या लोकांना "कवडेबाल" असे म्हणतात. त्यामुळे ह्याचे नांव कवडेबाल असे पडले. हा देव कुळे आणि शिंगावच्या शिमेच्या काही अंतरावर आहे. त्याची मूर्ती चांदीची आहे, आणि तो घोड्यावर विराजमान आहे. त्याचे देऊळ बांधायच्या दिवशी सात भट आणून पूजा केली होती. ह्या देवाला बळी दिलाच पाहिजे असे नाही. पण मागणे असले तरच देतात.

**३.२.१.२ दुधसागर समज**

**दुधसागर समज**

एकदा कर्नाटका ते गोवा या रूट सून ट्रेन थयसून वयताली. त्या ट्रेनीन खूप लोक आसले. ते सगळे कर्नाटका ते गोवा प्रवास करताले तयच कुळे या नावाचो गाव आसा. कुळे या गावाक फेमस दुधसागर धबधबो आसा. त्या ट्रेनोन एक बारिक चली वडल्यान रडता. रडपाचे थांबत ना ते. त्या चलयेच्या आवयन तेका थांबोपाचो खूप प्रयत्न केलो पून ते तिजे आयकच ना. मागी रागाचा नेटान त्या आवयेन तेका म्हणता तू आता रडपाचे थांबना जाल्यार हाव तुका हांगात दवरून वैतले. अशे मणताच ट्रेन बंद जाता. ट्रेनीन जे कामगार आसता ते खूप ट्राय करता ट्रेन चालू करपाची पून ट्रेन चालूच जायना सगळे हरशी ट्रेन चे सारखे आसले तरी ट्रेन चालू जायना. मागीर तयचो जो गावकर आसता तेका आपोन हाडता. गावकर येता आनि सगळ्यांक विचारता कोणी किदे हांका दवरून वयता मनलेले काय किदे अशे विचारता. सायडीन एकलो सांगपाक लागलो या बाय लेन आपल्या चेडवाक होका दवरून वैतले. अशे मणलेले. तर्ां बायल मागिर तेमच्या कडे रागान उलयता आनि झगडता. आपुन आपल्या चेडवाक हांगा दरवरची ना अशी मनता. तीका मागीर गावकर समजोन सांगता. मागीर आवय आपल्या चेडवाक थयच दवरता. त्या चेडवाक थय देवतोगीर ट्रेन मागीर चालू जाता. अशे मनताक की थयचो जो आजो आसा तो त्या चेडवाचो सांभाळ करता. अजून परे सांभाळ त्या चलयेचो

एके काळी कुळे नावाच्या गावात कर्नाटकातून गोव्याला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बरेच लोक प्रवास करत होते. कुळे नावाच्या गावात दूधसागर नावाचा प्रसिद्ध धबधबा आहे. धावत्या ट्रेनमधली एक छोटी मुलगी सतत रडत राहिली. आईने तिला थांबवण्याचा प्रयत्न केला. रागाच्या भरात आई तिला म्हणाली तू थांबली नाहीस तर मी तुला इथेच ठेवेन ती मुलगी रडतच राहिली अचानक ट्रेन थांबली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी वेगवेगळ्या मार्गाने ट्रेन सुरू करण्याचा प्रयत्न केला पण ट्रेन सुरू झाली नाही. सर्व भाग सर्व कामकाज चांगले होते. मग त्यांनी गावकरांना बोलावले. गावकरांनी लोकांना विचारले की देवाला काही देणार असे कोणी सांगितले आहे का? आई घाबरली आणि मग ती गावकरांशी बोलली मग गावकरने आईला तिच्या मुलाला

तिथे ठेवण्यास सांगितले आणि तिला तिथे ठेवल्यानंतर ट्रेन सुरू झाली. देव त्या मुलाची कायम काळजी घेईल अरो तेथील लोक असे म्हणतात. दुधसागरचा जो आजोबा आहे जो त्या मुलीचा सांभाळ करतो.

### ३.२.१.३ केळया- मेळया

**केळया- मेळया**

शिगाव या गावचे लोक अशे मन ताक की देवी केळया आनी मेळया लगीन जालेली ते सुदा दुसऱ्या दुसऱ्या जाग्यार.आनी गेल्या बारा वर्सा ती दोगाय एकामेकांक मेलोना. आनी गावचे लोक अशे मनतात की जो दोग बयण्यो बारा वारसांनी मेळता ती एक मेकांचे तोण पलेना.तेका लागून ती दोगाय एकमेकाक फाट करून उलयता. शिगाव या गावात त्या दोगाय बयनीच्यो मनजे दोनी देवीच्यो मुर्त्यो आसा.त्यो सुदा ऐका मेकासून खूप पैस आसा. मेकाक फाट करून आसाक ती.

शिगाव गावातील ग्रामस्थ सांगतात की केळया आणि मेळया नावाच्या देवतांची वेगवेगळया ठिकाणी लग्ने झाली आणि गेल्या १२ वर्षांपासून त्यांची भेट झाली नाही. गावातील लोक असे म्हणतात की त्या दोघी बहिणी बारा वर्षांनी एकमेकांना भेटतात पण ऐकमेकांचे तोंड पाहत नाही. शिगाव या गावात ती दोघी बहिणींची म्हणजे देवींच्या मुर्त्या आहेत. त्यासुद्धा एकमेकांशी दुर आहेत. आणि असे म्हणतात की १२ वर्षानंतर भेटलेल्या बहिणी समोरासमोर येऊ शकत नाहीत म्हणून या दोन देवी भेटल्या. १२ वर्षांनी एकमेकांकडे तोंड करून बोलले आणि शिगाव गावात त्यांच्या मुर्ती आहेत . त्यासुद्धा एकमेकांशी दुर आहेत मुर्त्या.

### ३.२.१.४ सातेरी देवाळाकडच्या उदकाची काणी

**सातेरी देवाळाकडच्या उदकाची काणी**

शिगांवच्या एका चलयेचें लग्न काले नांवाच्या गांवांत जालें. ती एका ल्हान चलये वांगडा रावताली. एक दीस शिगांवचो चलयेचो बापूय तिचे चलयेक मेळपाक आयलो तेन्ना ताका दिसलें ती चली एकलीच रडटा. तिची आवय घरा आयली तेन्ना तिच्या बापायन विचारलें. खंय गेल्ली तिणें उदक हाडपाक गेल्लें अशें सांगलें. हांगा उदक नाशिल्ल्यान तिका बरोच वेळ चलचो पडटा. वेलिप सांगतालो तें सगळे साकार जावपाक लागलें. बापायन आपल्या चलयेक सांगलें, थाळी दितलों त्या थाळीक हात लावंक नाका तें तुका त्या थाळींतल्यान उदक धाडटा बापूय गांवांत आयलो आनी देवांक तिच्या चलयेक उदक धाडपाक सांगलें. ताची धूव थाळीक हात लायली कारण ती थाळी भांगराची आशिल्ली आनी ती थाळी आपल्या चलयेक पोसटली अशें तिका दिसतालें आनी थाळीक हात लायतना ती दोन भाग जाली आनी देवळा लागसार न्हंयचे देगेर आशिल्ले व्हडले फातर दोन भाग जाले. आनी त्या चलयेची मूर्त तातूंत पडल्या अशें मानताले.

शिगाव येथील मुलीचे काले नावाच्या गावात लग्न झाले होते. ती लहान मुलीसोबत राहात होती. एक दिवस शिगाव येथील मुलीचे वडील तिच्या मुलीला भेटायला आले असता त्यांना दिसले की मुलगी एकटी आहे आणि ती रडत आहे. तिची आई घरी आल्यावर वडिलांनी विचारले. ती कुठे गेली आहे ती म्हणाली ती पाणी आणायला गेली आहे. इथे पाणी मिळत नसल्याने तिला जास्त वेळ चालावे लागते. वेळीप जे काही बोलत असे ते खरे ठरत होते. वडिलांनी आपल्या मुलीला सांगितले की एक  ताट देईन त्या ताटाला हात लावू नकोस त्या तारामधून तुला पाणी पाठवत आहे.  वडील गावात आले आणि देवांना तिच्या मुलीला पाणी पाठवायला सांगतात. देवींची पूजा करतात. त्याच्या मुलीने ताटाला हात लावला कारण ताट सोन्याचे होते आणि तिला वाटले की ती ताट आपल्या मुलीला खायला घालेल आणि तिला स्पर्श केल्यावर ताटाचे दोन भाग झाले आणि मंदिराजवळील नदीच्या काठावर मोठ्या खडकांचे दोन भाग झाले. आणि त्या कन्येची मूर्ती त्यात पडली असे मानले जात होते.

### ३.२.१.५ प्राण्याची पार्टी

**प्राण्याची पार्टी**

एक दिस जंगलात जनावराची मिंटींग हुती. सगळ्याच्यानी ठरीवल जंगलात एक पार्टी कराची. पार्टीला कावळा, चिमणी, ससा, कोल्हा, हत्ती, बाघ, हरण, कुत्रा, मांजर हे सगळ प्राणी आल हुत. पार्टी चालू झाली. पार्टीत खाया बरी दुध घालून खीर केली हुती.

खीर चुलीवनी उतरून सगळ प्राणी न्हव आंघोळ कराय जात्यात. मांजूर तेवड जायित नाही. मांजूर खीर राखीत आसात बसून बसून मांजार बेजारत. ते एवूडूशी खीर चाटून बगत. खीर खूप बरी झालती. आनी एकदा घेत आनी बरी लागती. परत परत खाऊन मडक होत रिकाम, खीर सगळी सोपती. मांजूर भीत आता के कराच, मडक तसच झापून ठेवत आनी कडव जाऊन बसत.

थोड्या वेळानी सगळी जनावर आंघूळ करून येत्यात. आंधूळ करून सगळ्याना चरचरून भूख लागली हुती, सगळी जनावर खाया बसली, मडक उघडून बगते झाल्या मडक्यात कायीच नाही. मांजराला विचारत्यात खीर खूट हा. मांजूर म्हणत मी तर बगलीच नाही. मी हितच बसून हा.

सगळ्याच्यानी खीर कुन्नी खाल्ली हे बघाय एक युक्ती क्याडली. जवळ एक ब्याव हुती. एक घागर घेतली आनी सगळी ब्यावीकड गेली, पयली वाघ गेला घागर ब्यावित ध्यातली घागरीव वर वाघ बसला आणि म्हनाय लागला मी खीर खाल्ली झाल्या बुड घागरी." घागर बुडली नाही. मग ससा गेला आणि म्हनाय लागला मी खीर खाल्ली झाल्या बुड घागरी." घागर बुडली नाही. अस करून सगळी जनावर गेली कोनूच बुडल नाही. आता फक्त मांजर उरल. मांजराला थरथरी भरली. तसच गेल आनी मांजूर घागरीव बसल आणि सावकाश म्हणाय लागल" म्याव.. मी खीर खाल्ली झाल्या बुड घागरी." तशी घागर डुब करून बुडली. सगळ्याना कळत मांजरानी खीर खाल्ली म्हनून.

एके दिवशी जंगलात एक प्राणी मिटिंग करत होता. सगळ्यांनी जंगलात पार्टी करायचं ठरवलं. या पार्टीत कावळे, चिमण्या, ससे, कोल्हे, हत्ती, वाघ, हरिण, कुत्रे, मांजर यांचा सहभाग होता. पार्टी सुरू झाली. पार्टीत खायला दुधासोबत खीर बनवली होती.

सर्व प्राणी खीर चुलीतून उतरून आंघोळ करायला जातात. मांजर मात जात नाही. मांजर खीर राखीत तिथे बसून मांजर कंटाळली आहे. इवुदुशी खीर चाटताना त्यांनी पाहिलं. खीर खूप छान होती. आणि एकदा घेतले की छान वाटते. पुन्हा पुन्हा खाल्ल्यावर भांडे रिकामे होतात, खीर संपते. मंजूर भीत आता भांडे झाकून कडू बसायचे. लवकरच सर्व प्राणी ओंघोळ करून येतात. सर्वांना भूक लागली होती. सर्व प्राणी जेवायला बसले. त्यांनी भांडे उघडले तेव्हा त्यात काहीच नव्हते. मांजराला विचारले की खीर कुठे आहे का? मला माहीत नाही. मी इथेच बसली होती.

त्याने एक युक्ती करून पाहिली की सर्वांनी खीर कुण्णी खाल्ली आहे. जवळजवळ एक सौंदर्य होते. ते एक भांडे घेऊन सर्व चोचपाचोळीकडे गेले. प्रथम वाघ चोचीकडे गेला. भांडे बुडले नाहीत. मग ससा गेला आणि म्हणाला, मी खीर खाल्ली आहे. भांडे बुडले नाहीत. अशा प्रकारे सर्व प्राणी निघून गेले आणि कोणीही बुडले नाही. आता फक्त मांजर उरली होती. मांजर थरथर कापली. तो जाऊन बसला आणि हळूच म्हणाला, "म्याव.. मी खीर खाल्ली आहे आणि मी बुध घागरी आहे." त्यामुळे घागरी बुडवून बुडाली. मांजरीने दूध खाल्ले हे सर्वांना माहीत आहे.

### ३.२.१.६ म्हातारा सिंह

**म्हातारा सिंह**

रानात योक शिव हुता. त्यो जंगलाचा राजा हुता. शिव आता खूप म्हातारा झाला हुता. शिवाला शिकार काराय होईत नव्हती. त्या शिवानी एक दिस सगळ्या प्राण्याना जमा केल आनी सांगल मी आता म्हातारा झाले माइयानी शिकार काराय होईत नाही. मी तुमचा राजा म्हणून सदीना एक एक जनावर येऊन माझ भोजन होईन प्राणी सगळ भिल. दुसरा दिस उजाडला. पयली हरण गेल शिवानी तेला खाल.

दुसरे दिवशी अस्वल गेल. अस करून सगळी जनावर एक एक दिस जाया लागली.

एके दिवशी सशाचा दिस आला. ससा याईस लेट गेला. शिवाला भूख लागली हुती. ससा लेट आला ते बगून रागावला. ससा धावत धावत आला. शिवानी विचारल इतका का धावला आणि टाईम का झाला. ससा म्हनाय लागला माफ करा महारज' मी टाईमाव आलो हुतो वाटत योक दुसरा शीव घावला तेन्नी मना आड्यावल, त्यो शिव म्हानाय लागला "आपून जंगलाचा राजा." ते आयकून शिवाला आला राग. शिवानी विचारल कुठ हा त्यो दुसरा शीव?' ससा म्हनाय लागला आपल्या बरोबर ये तुला दाखिवतो.

ससा शीवाला घेऊन एके बावीकडे जातो. ससा सांगतो महराज हे बावीत राहतो. तसा म्हातारा शिव बावीत डोई घालून बगतो. बाबीच्या पान्यात शिवाला आपलच तोंड दिसत. तेला वाटत बावीत दुसरा शिव हा म्हननू शिव डरकाळी फोडतो. तसच बावीत चित्र दिसत. त्यो म्हनतो मी राजा तस बावीत आवज गुजतो आणि परत तेचाच आवाज त्याला परतून आयकू येतो. आता शिवाला राग येतो. रागानी बाबीतल्या शिवाला मारायसाठी आपून आत उडी म्यारतो. शिव मरतो आणि ससा वाचतो.

म्हातारा सिंग जंगलात योक शिव होता. ती जंगलाची राजा होती. शिव आता खूप म्हातारा झाला होता. शिवाची शिकार झाली नाही. त्या शिवाने एके दिवशी सर्व प्राणी एकत्र केले आणि सांगितले की मी आता म्हातारा झालो आहे आणि मी आता शिकार करणार नाही. मी तुमचा राजा आहे, म्हणून मी दररोज प्रत्येक प्राण्यावर येऊन ते खाईन. पुढचा दिवस उजाडतो. पहिले हरिण शिवानी तेलाखाली गेले. दुसऱ्या दिवशी अस्वल गेले. अशाप्रकारे सर्व प्राणी एके दिवशी मरायला लागले.

एके दिवशी सशाचा दिवस आला. ससा उशीर झाला आहे. शिव भुकेला होता. त्याला उशीर झाल्याचे पाहून ससा संतापला. ससा धावत आला. शिवानीने विचारले की एवढी का धावली आणि वेळ काय आहे. ससा माफ करा महाराज म्हणू लागला' मला वाटले की, योक दुसऱ्या शिवाने मला घायाळ केले, तो शिव म्हणू लागला "तू जंगलाचा राजा आहेस". हे ऐकून शिवाला राग आला. शिवाने विचारले तो दुसरा शिव कुठे आहे?" ससा म्हणाला, "माझ्याबरोबर चल, मी दाखवतो.

ससा शिवाला एका बावीकडे घेऊन जातो. या भागात महाराज राहतात, असे ससा सांगतात. तर म्हातारा शिव हातात डोई घेऊन पाहत आहे. बाबीच्या पाण्यात शिवाला स्वतःचा चेहरा दिसेल. शिव हा दुसरा शिव आहे असे त्याला वाटते असे सांगून भीती तोडतो. तेच चित्र डावीकडे दिसेल. ती म्हणते मी राजा आहे आणि त्याला तोच आवाज पुन्हा पुन्हा ऐकू येतो. आता शिवाला राग आला. रागाच्या भरात तो शिवाला मारण्यासाठी आत उडी मारतो. शिव मरण पावला आणि ससा वाचला.

**३.२.१.७ बायको आणि कुत्री**

**बायको आनी कुत्री**

एक हुती बायको. ती गुरुवार हुती आणि त्यांची एक कुत्री होती ती भी गुरुवार हुती. बायको म्हणती आपल्याला मुस्काच्या शेंगा खाऊच्या झाल्यात कुणी आणून दिल्यासत्या तर खूप बरं झालं असतं. ती कुत्री ते आयीकती आणि कुत्री धावत जाती खूप लांब जाऊन ती मुस्कानच्या शेंगांचा भारा बांधून पाठिव मारून घेऊन येते आपुन गुरुवार असताना घेऊन येती आणि ते बायकोला देती, ती बायको शेंगांचं बरं सुख करती आणि एकटीच खाती. कुत्री तिच्या तोंडाकडे बगीत बसती पुण ती बायको कुत्रीला घालीत नाही. कुत्रीला खायाची चव येती. ती कुत्री देवाला म्हणती आपण इतक आणून दिलं आपल्याला एवडस सुध्दा तिनी घ्यातल नाही तवा बायकोच्या पोटात हा ते माझ्या पोटात जाऊनीय आणि माझ्या पोटात हा ते बायकोच्या पोटात जाऊनी.

थोड्या दिवसांनी दोघीव सुटत्याता, बायकोला कुत्र्याची पेटक होत्यात आनी कुत्रीला दोन सुंदर पोरी होत्याता. बायको पेटक टाकून देती. कुत्री आपल्या पोरीना घेऊन एक सुकलेले बावीच्या (विहिर) आत ठेवती. आपल्या पोरीना कुठलं कुठलं के आनून खाया घालून मोठी करती. त्या पोरी मोठ्या होऊन खूप बऱ्या दिसत्याता. एक दिस त्या पोरी बावीच्या बाहिर येऊन वर खेळट्याता. . ते दिस दोन राजकुमार शिकारीला रानात येतात. तेन्ना त्या पोरीचा खेळट्याला आवाज येतो. ते तिथ येऊन बगत्याता. त्या पोरी तेन्ना खूप आवडत्याता. ते राजकुमार लगीन कराय त्या पोरींचा हात कुत्रीकड मागत्यात. कुत्री दोगीव लेकीनच लगीन करून देती.

एक हुती बायको. ती गुरुवार हुती आणि त्यांची एक कुत्री होती ती भी गुरुवार हुती. बायको म्हणती आपल्याला मुस्काच्या शेंगा खाऊच्या झाल्यात कुणी आणून दिल्यासत्या तर खूप बरं झालं असतं. ती कुत्री ते आयीकती आणि कुत्री धावत जाती खूप लांब जाऊन ती मुस्कानच्या शेंगांचा भारा बांधून पाठिव मारून

घेऊन येते आपुन गुरुवार असताना घेऊन येती आणि ते बायकोला देती, ती बायको शेंगांचं बरं सुख करती आणि एकटीच खाती. कुत्री तिच्या तोंडाकडे बगीत बसती पुण ती बायको कुत्रीला घालीत नाही. कुत्रीला खायाची चव येती. ती कुत्री देवाला म्हणती आपण इतक आणून दिलं आपल्याला एवडस सुध्दा तिनी घ्यातल नाही तवा बायकोच्या पोटात हा ते माझ्या पोटात जाऊनीय आणि माझ्या पोटात हा ते बायकोच्या पोटात जाऊनी.

थोड्या दिवसांनी दोघीव सुटत्याता, बायकोला कुत्र्याची पेटक होत्यात आनी कुत्रीला दोन सुंदर पोरी होत्याता. बायको पेटक टाकून देती. कुत्री आपल्या पोरीना घेऊन एक सुकलेले बावीच्या (विहिर) आत ठेवती. आपल्या पोरीना कुठलं कुठलं के आनून खाया घालून मोठी करती. त्या पोरी मोठ्या होऊन खूप बऱ्या दिसत्याता. एक दिस त्या पोरी बावीच्या बाहिर येऊन वर खेळट्याता. ते दिस दोन राजकुमार शिकारीला रानात येतात. तेन्ना त्या पोरीचा खेळट्याला आवाज येतो. ते तिथ येऊन बगत्याता. त्या पोरी तेन्ना खूप आवडत्याता. ते राजकुमार लगीन कराय त्या पोरींचा हात कुत्रीकड मागत्यात. कुत्री दोगीव लेकीनच लगीन करून देती.

त्या लेकी खूप मज्जेत राहत्याता लगीन करून. एक दिसती कुत्री आपल्या लेकींचींत जाती, थोरली लेकीसत पयली जाती. थोरली आईला कुत्री म्हणती आनी जमनीव बशीवती. पाड ताटात पेज दिती आणि धाडावून घ्यालती. कुत्री भापडी रडत बारके लेकीस्त जाती. धाकटी लेक आई बगून यांग म्यारती. आई आली म्हणून बर जेवन करती. आईला आंधुळ कराय पानी देती. बसाय पाट देती. बर जेवान व्याडती. आई जाताना भेटून रडती. थोड दिस जात्यात धाकटी लेक आईचीत येती, कुत्री बर खाया करून घ्यालती, धाकटे लेकीला घरा जाताना खूप भांगार देती. हे सगळ थोरले लेकीला कळट. आई आपल्याला भी भांगर देईन म्हनून आईस्त येया येती वाटत तिला साप चावतो आनी तिथच ती मरती.

### ३.२.१.८ हुशार कोल्हो

एक आशिल्लो कोलो आणि आशिल्ली कोली एक दिस कोल्यात आणि कोल्हीयेन किदे ठरेले की आम्ही एक जेवण दिवचे सगळयांक आपोन. म्हटल्यार जेवण दिवचे म्हणून हेने सगळी तयारी बी केली. आणि कोल्हीयेन किदे केले सगळे जेवण बी केले आणि कोल्हयाक सांगले किदे सगळयांक आपोपाक वस. हे सगळे जर जेवण सगळयांनी खाल्ले जाल्यार आपल्याक खावपाक मेळचेना. म्हणून कोल्हयान किदे केले सगळी जाणा तुमी कोवडी लावून गप चूप घरान रावा बायर सरुनाका. अशे सांगता आणि तो घरा येता. कोल्हो येत जाल्यार कोल्ही मणता अजून कोणूच लोक  येवूकना. आता किदे करतोलो इतले जवण केला ते. कोल्हो मणपाक लागलो थोडे वेळ रावूया. थोडो वेळ जालो कोण योना शे पळोन हेने जेवपाक सुरुवात केली. म्हणजे कोल्याक ते जवण दिल्ले नाका आसले. किद्याक काय मणल्यार आपल्याक पोट भरून काय खावपाक मेळचेना मागी दुसऱ्या दिसाक कोल्ही विचारता सगळयांक तुम्ही काल जेवपाक येली ना. ये ना कोल्यान येवून  सांगले काल तुमी कोणुच घरा येवनाका तुमी घरान गप चूप निदून रावा मणून बायर कोण वाघ आयला.

एक होता कोल्हा आणि एक होती कोल्ही.. एके दिवशी कोल्ह्याने आणि कोल्हीने ठरविले की आपण एक दिवस सगळयांना जेवायला बोलायचे. असे ठरविले आणि कोल्हीने जेवणाची सगळी तयारी केली आणि कोल्ह्याला सांगितले की जा आणि सगळयांना बोलावून आण. कोल्हा विचार करतो हे सगळे जण येथे येऊन सगळयांनी जेवण केलं तर आपल्याला खायला मिळणार नाही म्हणून तो काय करतो. सगळयांच्या घरी जातो आणि त्यांना सांगतो की तुम्ही सगळेजण दार लावून गप्प घरात बसून रहा. बाहेर येऊ नका असे सांगतो आणि तो आपल्या घरी येतो. घरी येतात कोल्ही त्याला म्हणते अजून कोणीच का आला नाही. आता आपण काय करायचं इतकं जेवण केलं त्याच . कोल्हा तिला सांगतो थोडावेळ वाट बघूया त्यांची.  खूप वेळ झाला आणि ते कोणीही आले नाही ते पाहून कोल्हा जेवायला सुरुवात करतो. कोल्ह्याला ते सगळेजण जेवायला आलेले नको होते कारण आपल्याला पोट भरून जेवायला मिळणार नाही म्हणून. मग दुसऱ्या दिवशी कोल्ही सगळयांना विचारते तुम्ही काल जेवायला का आली नाही ते सर्व सांगू लागतात

कोल्हा आमच्याकडे येऊन सांगून गेला की तुम्ही कोणीच घरी येऊ नका. गपचूप घरा मध्ये राहा कारण बाहेर वाघ आला आहे तो तुम्हाला खाणार असे सांगून तो जातो.

### ३.२.१.९ हावरो ससो

**हावरो ससो**

एक आसलो ससो. सामको हावरो. तेजो फक्त एकूच उद्योग आसलो खा खा खावप आणि दिस रात निदोप. सोश्याक कितले दी आसले पुण तेजे पोट मात कशेत भरना आशिल्ले.

एक दिस सगळे सोश्ये मेळोन चण्याचे शेतान खावपाक वयता. सगळे सोश्ये बेगी बेगीन खाताक पुण हावऱ्या सशाचे मात खावून सोपना. एक ससो हावऱ्या सश्याक मणपाक लागलो ये सोश्या बेगीन खा शेतकऱ्याचो येवपाचो वेळ झाला. जर शेतकऱ्यान तेजे शेत खातना पळेले जाल्यार तो आनी आमका कसोच सोडचोना. हावरो ससो मणता अरे राव रे मझे अजून पोट भरोना हाव आणिक थोडे शे खाता मागी या आमी. अशे मणोन हावरो ससो भकाभक खावपाक लागता. इतल्यान दुसरो ससो ते का मणता तो पळे पयसोल्यान शेतकरी येता तो दिशटी पडता चल या आमी होय रे शेतकार अजून शेतान पावूना मरे तो पावता मणसर खुप वेळ आसा माका आणि इल्ले शे खावपाक दी माजे जातो गीर या आमी. मयता मणल्यार शेतकार शेतान पावता शेतकऱ्या क पळोन सगळे सश्ये वडोली वडोली उडी मारून धावपाक लागता. पुण खुप खाल्या कारणान हावऱ्या सोश्येच्यान धावपाक जायना तेज्या वागोड चे सगळे सशे आप आपल्या घरा पावता हेवटेन हावऱ्या सश्याक मात शेतकऱ्या कडल्यान खूप मार पडता.

एक ससा होता. खूप गर्विष्ठ. रात्रंदिवस खाणे आणि झोपणे हाच तेजोचा उद्योग होता. सोश्याला बरेच दिवस होते पण पोट भरत नव्हते.

एके दिवशी सर्व डुकरे एकत्र येऊन हरभऱ्याच्या शेतात खायला जातात. सर्व डुकर लवकर खातात पण ससा संपत नाही. एक ससा त्या सशाला म्हणाला, “ये ससा, लवकर जेवून घे. शेतकरी यायची वेळ झाली आहे. शेतकऱ्याने आम्हाला शेतं खाताना पाहिलं तर तो आम्हाला सोडणार नाही. माझी मेव्हणी म्हणते अरे थांब मी अजून भरले नाही अजून मला थोडे खायचे आहे तिने आम्हाला सोडले. त्याबरोबर

हावरो ससा खाऊ लागतो. मग दुसरा ससा म्हणतो तो काय म्हणतोय ते बघ दुरून येणा-या शेतकऱ्याकडे तो दिसतो चला जाऊया, शेतकरी अजून शेतात पोचला नाही तो माणसापर्यंत पोचतोय माझ्याकडे खूप वेळ आहे आणि मला थोडे खायला द्या ती माझी जात आहे. चला जाऊया. शेतकरी शेतात आल्यावर सर्व माकडे उड्या मारून पळतात. मात्र जास्त खाल्ल्याने ससा शेतकऱ्यापासून पळून जाऊ शकत नाही. तेजा वाघोडचे सर्व ससे त्यांच्या घरी पोहोचतात. दुसरीकडे ससा शेतकऱ्याला मारहाण करतो.

**३.२.१.१० सात सुना**

अर्जुन गावड्याच्या सात जाणी सुना. त्या सुना गेल्या तडेवर पाण्या. पाण्यात जावून तेमच्यानी बुडबुड्या घाघरी बुडाल्या. सोन्याच्या चुंबळी केल्या. सोनाच्या चुंबळी करून घरात पाणी घेवून आल्या. छान क्योर काढला. घराला शेण काढायला लागले. शेण काढल्या सगळे गेले.

अर्जुन गावड्याच्या सात जाणी सुना सात जाणी सुना

गेल्या त्या गेल्या तळीवर पाण्या तळीवर पाण्या

बुहुल्या बुडुल्या बुडबुड्या घाघरी (२)

केल्या त्या केल्या ता सोन्याच्या चुंबळी (२)

उचल्या उचल्या तांब्यांच्या घाघरी

अर्जुन गावड्याच्या सात जाणी सुना. त्या सुना गेल्या तडेवर पाण्यात. पाण्यात जावून त्यांनी बुडबुडया घाघरी बुडाल्या. सोन्याच्या चुंबळी केल्या. त्या चुंबळी करून घरात पाणी घेवून येतात. झाडूने कचरा काढला. नंतर घराला शेण काढायला लागले. शेण काढल्यावर सगळे गेले.

### ३.२.१.११ म्हातारी आनिक कोमो

**म्हातारी आनिक कोमो**

एक आशीली म्हातारी आनि ती गेली लाकडांक. शेजारी गेली तेज्या फुड्या ते सोवका चलत चलत उसा फाटल्यान शेजाऱ्यांक सांगपाक लागली माका इल्लो चुनो दवर गो मणोन शेजाऱ्यांनी तीचे आयकोना. तीका थय चुनो मेवलो फातरार तीने पान काढतले , चुनोलायला पानाक आनि पान खाल्ले . थोडया दिसानी म्हातारेगे जाता कोमो आता कोम्पाक खावक किदे घातपा खातीर म्हातारी राजागेर कामा वसोन कोणीयो हाडपा लागली. इल्लो इल्लो करून कोमो वड झालो. म्हातारे एक दिस कोमो किदे मणोक लागलो ' म्हातारी बाय राजाक वसोन विचार राजा म्हका तेजी कन्या दिता काय म्हणून मेलो मेल्ला राजाली कन्या मागतलो तू कोमो अनि राजा तुका कन्या दितलो अशे म्हणून म्हातारी बेजार जाता. ती राजागेर सदा बशेन कामा वचोन येता. कोमो म्हातारेक येतोगीर विचारपाक लागलो विचारले गे राजाक असोतू फक्त विचार फुडले हाव पोयता अशे करून तो सांगपा लागलो. ती म्हातारी राजाक भिवून भिवून सांगता राजा म्हातारेक भायर घालता. म्हातारी बडबडत घरा येता परत कोमो म्हातारेक धाडता. परत राजा म्हातारेक धावणोन घालता.आता लास्ट तीसरे फावट तू राजाक विचार मनून कोमो तीका धाडता. परत तिका राजा धावणेता. कोमो म्हातारेक सांगता उदोक तुका जाय तितले बरान दवर फुडले हाव पोयता . तो वयर हुडोन वयता आणि उदक सगळे बन करता. सगळ्याक उदक ना. लोग उदकाक तळमळता. राजा एक मनश्याक आपोन वरता आणि ताका विचारता उदक कशे बन जाले . तो ताका सांगता राज्यान कन्या कोम्याक दिना म्हटले मणून कोम्यान उदक बन केले राजा. म्हातारेक ताबडतोड आपयता आनिक लगनाक स्वीकार करता. कोम्याचे घर खोप आणि कन्या राजमहलाची . कोमो सांगता माझ्या पाराच्यान तुझ्या दारान माठो घालपाचो तो माटोव हाव घालता पळेल्यार किदे मोतीयांचो माटो सकाळी उटोन थोड्या लोकांनी सगळी मोती वेल्ली. एक दिसा हागचान आनि एक म्हातारी येताली . तीने ते कन्याक विचारले तू किदे चितता म्हातारी तेका सांगता तुझे बोट काप आणि बरी मेतो वाट आणि लाय बोटा आनि रातभर जागे राव . कन्या तशेच करता मिरसांगेचो मेतो बांधता राच्चे उठोन कट्टे काडून राजचो कय तरी वयतालो ते कट्टे उजान घाल अशे म्हातारेन सांगले. कन्या कट्टे उजान घालता . तय तेका तो वास येता तो धावोन येता घात झालो . पयल्यार की दे राजकडल्यान वडले घर काम्याचे कोमो प देवारूप आशील्लो.

तिथे एक वृद्ध स्त्री होती आणि ती जंगलात गेली. शेजारी तेजाच्या समोर गेला आणि ती हळूच तिच्या मागून चालत गेली आणि शेजाऱ्यांना म्हणाली की माझ्यासाठी थोडा चुना लावा, शेजाऱ्यांनी तिचे ऐकले नाही. तिला तिथे चुना सापडला आणि त्यापैकी तीन खडकावर पाने कापतील काही दिवसांनी ती म्हातारी म्हातारी झाली आता म्हातारी बाई राजाच्या घरी कोणाला तरी कामावर आणू लागली. हळूहळू कोमो वाढला. एके दिवशी म्हातारा कोमोला काहीतरी बोलू लागला, 'म्हातारी स्त्री राजाजवळ बसते आणि

राजा त्याला वधू देईल का, असे विचारते. ती नेहमीप्रमाणे राजाच्या घरी कामाला येते. कोमो म्हातारी कधी आली हे विचारू लागला. म्हातारी स्त्री राजाला सांगते की राजा म्हातारीला बाहेर काढत आहे. म्हातारी कुडकुडत घरी येते आणि पुन्हा कोमोने त्या वृद्ध महिलेला निरोप दिला. पुन्हा राजा त्या वृद्ध स्त्रीचा पाठलाग करतो. आता शेवटच्या तिसऱ्यांदा तुम्ही तिला राजाचा विचार करून कोमोला पाठवा. पुन्हा तिचा राजा पाठलाग करतो. कोमो म्हातारीला सांगतो.राजा पाठलाग करतो. कोमो म्हातारीला सांगतो की तुला पाहिजे तेवढे पाणी ठेवा तो वर जातो आणि पाणी सर्व काही थांबवते. प्रत्येक गोष्टीसाठी पाणी नाही. लोकांना पाण्याची हाव आहे. राजा एका माणसाला बोलावतो आणि पाणी कसे थांबले ते विचारतो. तो त्याला सांगतो की राज्याने सांगितले की वधू कोमाला दिली जाणार नाही. तो वृद्ध महिलेला बोलावतो आणि लग्न स्वीकारतो. स्वल्पविरामाचे घर म्हणजे झोपडी आणि नवरी म्हणजे राजवाडा. कोमो माझ्या बाजूने म्हणतो, तुझा दरवाजा मोत्यांनी मढवणार आहे. काही लोकांनी सकाळी उठून सर्व मोती फेकून दिले. एके दिवशी हगचनहून दुसरी म्हातारी आली त्यांनी मुलीला विचारले की ती काय विचार करत आहे. म्हातारी म्हणाली, "तुझे बोट काप आणि माझी वाट बघ वधू तेच करते आणि मिरपूड बांधते. रच्चे उठते आणि काठ्या बाहेर काढते. कन्या काठी पेटवते. तिथे त्याला त्याचा वास येतो तो पळून जातो ही हत्या होती पहिले की राजाचे मोठे घर कामाचे आहे. तो देवाच्या रूपात होता.

**३.२.१.१२ रगताचे तळे**

रगताचे तळे

सात जाण भाव आसता आनि तेमची एक बयन आसता. तीका लग्न करून सात वाड्याच्या बायर दिलेले. एका दिसाक ते सात भाव तेका घरा हाडपा खातीर तेमगेर वयता. तेमगेर पावतोगीर तेमची बयन  तेमका चाव आनि खावपाक हाडून दिता ते सगळे खाताक आनि परत मागता ते तेमका सगळे हाडून दिता . तरी तेमचे पोट भरना आनि हाड मणता ते सांगता सगळे सोपले मणून . ते मणताक आमका आनि जाय मणून ते मणता की आपल्या कुच खा म्हणून. ते भाव तेज्या हाती पायाक बांधता आनि तेका सुरीयेन मारता. तेका मारतोगीर थय तेजे रगतान भरता आनि तळे जाता.

. तयसून ते वयता. थय मागिर एक साळख फुलता आनि मुस भोवता. त्या सात भावा भितून एक जो आसता तो तेका मारपाक वसना. तो थय पावता तिज्या बहिणीक मारलेले थय तेन्ना तेज्या कानाकड घु घु करीत भोवरो मुस येता. तोमुस जो तेजी ब यन आसता. तो घु घु करून  तेका सगळे सांगता आपत्या भावांनी मका हात पाय बांधून मना सुरेन कातरले मनून. तेजे आयकोन भावाक रडपाक येता. मागिर तो देवाकडे मागणे करता आपल्पा बयनीक जीते कर मनून  . मागिर ती दोगाय खुशेन रावताक.

सात जण भाऊ आहेत आणि त्यांची एक बहिण आहे. तिला लग्न करून सात वाड्याच्या बाहेर दिली. एके दिवशी ते सातही भाऊ तिला घरी आणायला तिच्या घरा जाते. भाऊ तिच्या घरी पोहचल्यावर त्यांची बहिण त्यांना चहा आणि खायला आणून देते. ते चहा पितात आणि खाऊ खातात व  दिला सांगतात आणखी खाऊ घेवून ये म्हणून ती घेवून येते. ते खावून ही त्यांचे पोट भरत नाही. त्यांना देवून देवून सगळे संपले . तरी ते तिच्याकडे खायला मागतात. शेवटी ती त्यांना येवून सांगते की खावू सगळा संपला आता तुम्ही मलाच मारून खा. हे ऐकून ते भाऊ तिचे हात पाय बांदतात आणि घरी जाताना वाटेवर चाकूने तिला मारतात. तिला मारून तिथे रक्ताने तिकडे भरले. ती जागा रक्ताने भरलेले तळे असे दिसते. काही दिवसांनी

तिकडे एक कमळ फुलते. त्या कमळावर मख्यी भूर भूर करून फिरत होती. तिकडे त्यांचा धाकला भाऊ जातो. त्या बघून ती मख्यी तिच्याकडे येते. त्यांना भूर भूर करून सगळे सांगते. आपल्याच भाऊंनी तिला मारले हे ऐकून तो भाऊ चक्क झाला. त्यानंतर तो भाऊ देवाकडे मागणी करतो आपल्या बहिणीला जीवनदान दया म्हणून. देव त्याची प्रार्थना ऐकतो व तिला जिवंत करतो. मग ती दोगी जण आनंदाने राहू लागली.

### ३.२.१.१३ म्हातारी आणि तिजो पोर

म्हातारी आणि तिजो पोर

म्हातारी आणि तिचो पोर रानात खोपीक रावताली . म्हतारी तिज्या पोराक सदा पातोळ्यो करून खावपाक दिताली. त्याच आसताना तेका खोपीकडे पोर दिशटी पडता तो पातोळी हातीन धरून उभो आसलो. तेका पळोन राकक्षीण मनान मणता हो जर आपल्याक मेवळो जाल्यान माजे पोट रोकडेच भरतले अशे ती चित्ता आणि तेका धरपाक वयता तिथय पावता पावता मणल्यार  तो बितून वयता. राकक्षीण बेजारता आणि वयता. दुसऱ्या दिसाक ती थय परत येता तेन्हा तो तिज्या हाती मेळता ति तेका  साकान घालून आपल्या गुफेत घेवुन वयता. मागीर ती तेका गुफेत आपल्या चेडवाकडे दवरून वयता. त्या पोराचे केस मातशे तांबडे कशे आसता. राकक्षीणी चे चोडू तेका विचारता तुजे केस अशे कशे काय मणून तो पोर हुशार आसता तो तेका सांगता कि माज्या आईन माजी तकली दोडेलेली आणि मागीर माजे केस तशे जाले हे सगळे आयकोन राकक्षीणील्या चेडवाक खरे दिसता ते मणता तेका माकाय बीन आपले केस तशे जाय. ते तेका सांगता आपल्याक दोडे मणून तो तेका  साकान बांधता आणि तेजी तकली दोडेता . दोडोन दोडोन तेमागी मरता. तो पोर मागीर थयसून वयता. थोड्या वेळान मागीर राकक्षीण गुफेत येता. थय ती पळेता सगळी कडे रगत पडलेले आसता. ती वयता आनि ते रगत पिवपाक लागता. ती रगत पिता ते पळोन कोन तरी तेका पळोन मणता आपल्याच दुयेचे आपुनूच रगत पिता म्हणून. ती त्या पोराक सोदता मागीर. तो तिका उदकात उभो आसलेलो पळोन राकक्षीण तेज्या कडे वयता आणि तेका विचारता तू उदकान कसो गेलो काय म्हणून तो पोर तिका सांगता मोट्टो  फातर घेतलो आणि उदकान उडी मारली.तेजे आयकोन राकक्षीण मोट्टो फातर घेता आणि उदकान उडी मारता आणि थयच मरता.

### ३.२.१.१४ म्हाताराची काणी

**म्हातारीची काणी**

एक हुती म्हातारी आणि तिचा योक हुता पोरगा. दोघ बरी राहीती. थोड्या दिसानी पोरग्याच लग्नीन झालं. बायकोला आपली सासो नको हुती.

एक दिस बायकोनी आपल्या दादल्याला सांगल. तुजे आईला मारून ह्याक नाही झाल्या मी घर सोडून जाईन. पोरगा भिला बायको सोडून जाईन म्हणून. एक दिस आईला बर खाया दिल आणि त्या जेवणात बेशुद्ध व्हाच वखाद घ्यातल. म्हातारी पोटाभर जेवली. थोड्या वेळानी म्हातारी बेशुद्ध झाली. पोरग्यानी आईला पोतीत भरली आणि जाळाय रानात घेऊन गेला. लाकड घ्यातली. फस्क माराय जातो तर फस्क नाही. फस्क आनाय घरात गेला.

थोड्या वेळाती म्हातारी शुद्धीव आली. लाकड क्याडली आणि हुती तशी परत लाकड घालून म्हातारी झाडाव चडली. पोरगा थोड्या वेळानी आला लाकड जाळली आनी गेला.

त्या दिसाला म्हातारी झाडाव न्हीदली. रात्री चोर आल भांगर पैसा घेऊन. पैसे नेजाय झाडाचे बूडी बसल . म्हातारीवर सुसंत न्हिदल्याली घोराय लागली. चोर भिल त्यांना वाटल भूत आल. भिवून पैस आणि भांगर टाकून चोर पळून गेल.

सकाळी म्हातारी झाडावनी खाल उतारली. सगळ पैस आणि भांगर जमा करून घराव घेऊन गेली. पोरगा आणि सून बघितूच राहिली. भांगर आणि पैस बघून म्हातारीला विचार हे सगळ कुठणी आणल. म्हातारीनी सांगल मला जाळल तवा एक परीन दिल. ते आयकून बायकोला वाटल म्हातारीला इतक दिल झाल्या मना खूप देईन.

दुसरी दिशी बायको सांगती आपल्या धनगराला आपल्याला जाळ आपून भांगर आणि पैस घेऊन येते. तिला जाळतो तिचा धगोर पूण खूप दिस व्हत्यात ती बायको परत इतूच नाही.

## उपुरबायेचे चेडु

